cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१९७ | शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रुपये

**संपादकीय**

## बिहारचा आजचा कौल दिशा देणारा

बिहार विधानसभा निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बिहार भाजप प्रणीत एनडीएच्या ताब्यात राहतो, नितीश कुमार बिहारचे मुख्यमंत्री म्हणून दहाव्यांदा शपथ घेतात की त्यांचा महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उद्यापासून सोयाबीन, मूग, उडीदची हमीभावाने खरेदी सुरू!

## नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना दिलासा

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व 'नाफेड' यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगाम (२०२५–२६) मध्ये शासनाने निश्चित केलेल्या हमीभावानुसार मूग, उडीद आणि सोयाबीन खरेदीसाठी शेतकरी नोंदणी ३० ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे. प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात येणार आहे.**

यंदा राज्य सहकारी पणन महासंघाच्या (एनसीसीएफ) वतीने नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, हिंगोली, चंद्रपूर व नागपूर या जिल्ह्यांमध्ये खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. हमीभावानुसार ८ हजार ७६८ रुपये प्रति क्विंटल, उडदाची ७ हजार ८०० रुपये प्रति क्विंटल, सोयाबीनची ५ हजार ३२८ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी आपल्या गावाजवळील 'नाफेड' किंवा ▶▶ पान २ वर




**धक्कादायक खुलासा!**

## तब्बल ३२ कारने देशभरात घडवायचा होता स्फोट



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

दिल्लीतील लाल किल्ला स्फोटाच्या तपासात एक मोठा खुलासा समोर आला असून ३२ गाड्यांमध्ये बॉम्ब आणि स्फोटके बसवून देशभरात ३२ ठिकाणी स्फोट घडवून आणण्याचा कट रचण्यात आला होता. १० नोव्हेंबर रोजी स्फोट झालेली आय २० कार या मालिकेतील एका हल्ल्याचा भाग होती.

बाबरी मशीद पाडल्याच्या वर्धापन दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी दिल्लीसह अनेक ठिकाणी स्फोट घडवण्याची दहशतवाद्यांची योजना होती. तपास यंत्रणांनी आतापर्यंत चार गाड्या जप्त केल्या आहेत. यामध्ये ▶▶ पान २ वर

# प्रचारात जेवणाचे दर आयोगाने ठरवले!

## बिर्याणीसाठी १५० अन् पावभाजीसाठी ६० रुपये

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत पहिल्या टप्प्यात नगरपंचायत आणि नगर परिषदेच्या निवडणुका होत आहेत. इच्छुकांनी उमेदवारी अर्ज भरण्यास देखील सुरुवात केली आहे. दरम्यान, निवडणुकीतील प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांसाठी चहापान, जेवण, सभा, प्रचारासाठी वाहन, रॅली, जाहिरात आदी बाबींवर खर्च करावा लागतो. या खर्चाबाबत निवडणूक आयोगाने दर निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्याचे दर देखील ठरले असून,



बिर्याणी १५०, पावभाजी ६० तर चहा १० रुपये दर आहेत. उमेदवारांना या प्रमाणेच खर्च करावा लागणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर मतदानाच्या दिवसापर्यंत खर्चाची दैनंदिन नोंद ठेवणे हे उमेदवारावर बंधनकारक आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणुकीतील विविध खर्चाचे दर सर्व राजकीय पक्षांच्या बैठकीत निश्चित केले आहेत. या दरानुसार उमेदवाराला एका चहासाठी १० रुपये, कॉफी– १५ रुपये, पाव–भाजी– ६० रुपये, व्हेज थाळी स्पेशल– १८० रुपये, नॉनव्हेज थाळी– २४० रुपये आणि बिर्याणीसाठी १५० रुपये खर्च करता येणार आहेत. दैनंदिन खर्चाची नोंद बंधनकारक आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून हा खर्च ग्राह्य धरला जातो. उमेदवार राष्ट्रीयीकृत किंवा सहकारी बँकेत खाते उघडू शकतो. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून ▶▶ पान २ वर


### खाद्यपदार्थांचे दर

चहा– १०, कॉफी– १५, पोहे– २०, वडापाव– १५, भजे प्लेट– २०, पाणी बाटली– १७, मिसळपाव– ६०, पाव भाजी– ६०, व्हेज थाळी स्पेशल– १८०, नॉनव्हेज थाळी– २४०, बिर्याणी– १५० रु.

### इतर खर्च

फुलांचा लहान हार– ३० रु., फुलांचा मोठा हार– ८० रु., गांधी टोपी– १० रु., फेटा– १९० रु., ढोल–ताशा (प्रतिव्यक्ती)– ५०० रु., मंडप– १५ रुपये स्क्वेअर फूट, खुर्ची (प्लास्टिक)– १० रुपये भाडे (प्रतिदिवस), व्हीआयपी सोफा– दीड हजार रुपये, पिण्याच्या पाण्याचा टँकर– २ हजार २०० रुपये, माहितीपत्रक (अ४ साईज)– एक हजारसाठी ४ हजार २५० रुपये.

# परळी वीज केंद्र ठप्प; राज्यातील १३ युनिट बंद



**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यात सरप्लस वीज उपलब्ध असून, यातच काही दिवसांपासून थंडी वाढल्याने राज्यातील विजेची मागणी कमी झाली आहे. परिणामी औष्णिक वीज केंद्रांपैकी ११ युनिट बंद ठेवण्यात आली आहेत, तर दोन युनिट इतर कारणांमुळे बंद आहेत. अशा प्रकारे राज्यातील एकूण १३ युनिट बंद आहेत.

### बंद युनिटचा खर्च अधिक

बंद केलेल्या सर्व युनिटची उत्पादन खर्च प्रतियुनिट ५ रुपयांहून अधिक आहे. परळी केंद्राचा उत्पादन खर्च अनुक्रमे ६.९२८ आणि ७.५१५ रुपये प्रतियुनिट इतका आहे. त्यामुळे ज्या युनिटचा उत्पादन खर्च कमी आहे, त्यांना प्राधान्य दिले जात आहे. खासगी क्षेत्रातून ५,२३२ मेगावॉट, केंद्र सरकारच्या एन.टी.पी.सी. कंपनीकडून ४,८६३ मेगावॉट आणि जलविद्युत प्रकल्पांमधून १,५०३ मेगावॉट वीज घेतली जात आहे.

### खासगी क्षेत्राचे उत्पादन वाढले

महागडी वीज असल्याने सरकारी वीज केंद्रे बंद ठेवली जात असताना, खासगी क्षेत्रातील केंद्रे मात्र मोठ्या प्रमाणात उत्पादन करत आहेत. राज्यातील खासगी औष्णिक वीज केंद्रांची एकूण उत्पादन क्षमता ५,७८५ मेगावॉट असून गुरुवारी सायंकाळपर्यंत त्यांच्याकडून ५,२३२ मेगावॉट वीज घेतली जात आहे. महावितरणच्या मते, या केंद्रांतील उत्पादन खर्च प्रतियुनिट ५ रुपयांपेक्षा कमी असल्याने त्यांच्याकडून वीज घेणे फायदेशीर ठरत आहे.

परळी येथील औष्णिक वीज केंद्र पूर्णपणे ठप्प झाले ▶▶ पान २ वर

# राज्यभरात सीईटी कक्षाची असणार स्वत:ची ४० मदत केंद्रे

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे मोठे पाऊल, विद्यार्थ्यांना आता जिल्ह्यातच मिळणार सुविधा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना आता मुंबईत येण्याची धावपळ करावी लागणार नाही, सीईटी परीक्षा आणि प्रवेश प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणींवर थेट स्थानिक स्तरावर उपाय मिळावा, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मोठे पाऊल उचलले आहे. सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने राज्यभरात स्वत:ची तब्बल ४० जिल्हास्तरीय मदत केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्यातूनच सर्व प्रकारचे मार्गदर्शन, अर्ज प्रक्रियेतील सहाय्य आणि तक्रारींवर तत्काळ निवारण मिळणार आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरण आणि सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) यांच्या समन्वयातून तंत्रशिक्षण, उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आयुष शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण या सहा विभागांतर्गत एकूण २० विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ▶▶ पान २ वर

# वाळू माफियांचा महसूल पथकावर हल्ला; दोन आरोपींना अटक

**आष्टी । प्रतिनिधी**

शहराजवळ छापा टाकल्यानंतर आणि बेकायदेशीर उत्खननात सहभागी असलेल्या वाहनांना जप्त केल्यानंतर वाळू माफियांनी एका महिला अधिकाऱ्यासह महसूल विभागाच्या पथकावर हल्ला केला आहे. बुधवारी सायंकाळी ५.४५ च्या सुमारास ही घटना घडली. हल्लेखोरांनी एका अधिकाऱ्याला ▶▶ पान २ वर

# शरद पवारांना डोके दुखी ठरणारी पिपाणी निवडणूक आयोगाकडून हद्दपार




**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार यांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादीची दोन शकले झाली. यामध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीला घड्याळ चिन्ह मिळाले, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला तुतारी वाजवणारा माणूस मिळाला. मात्र अपक्षांना ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तर त्या विद्यापीठाची मान्यता रद्द होणार

दिल्ली : दिल्लीतील लाल किल्ला बॉम्बस्फोटानंतर चर्चेत आलेले फरीदाबादमधील अल–फलाह विद्यापीठ आता नव्या वादात सापडले आहे. राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदने या विद्यापीठावर खोट्या मान्यतेचा दावा केल्याचा आरोप केला आहे. या संदर्भात नॅकने विद्यापीठ प्रशासनाला नोटीस बजावून ७ दिवसांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा, विद्यापीठाची मान्यता रद्द करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या विद्यापीठाची स्थापना २०१४ साली हरियाणा प्रायव्हेट युनिव्हर्सिटी ॲक्ट अंतर्गत झाली होती. त्यानंतर २०१५ मध्ये युजीसी कडून मान्यता देण्यात आली आणि २०१९ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयालाही मान्यता मिळालेली आहे.

### खा.कंगनावर देशद्रोहाचा खटला चालणार

दिल्ली: दिल्लीतील शेतकरी आंदोलनावरून वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या सिनेअभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना रानौत यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांचा अपमान आणि देशद्रोहाच्या आरोपाखाली आता कंगना यांच्यावर उत्तर प्रदेशातील आग्रा येथे खटला चालवला जाणार आहे. झालेल्या सुनावणीत आग्रातील खासदार–आमदार प्रकरणांसाठीच्या विशेष न्यायालयाने कंगनाविरुद्ध दाखल केलेली पुनर्विचार याचिका स्वीकारली. या याचिकेवर २९ नोव्हेंबर रोजी सुनावणी करण्यात येणार आहे. विशेष न्यायाधीश लोकेश कुमार यांनी सांगितले की, ज्या कनिष्ठ न्यायालयाने यापूर्वी कंगनाविरुद्धचा खटला फेटाळला होता, त्याच कनिष्ठ न्यायालयात पुन्हा खटल्याची सुनावणी करण्यात येईल.

### भाजपकडून स्टार प्रचारकांची यादी जाहीर

मुंबई : राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजपने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील प्रमुख नेत्यांचा या यादीत समावेश करण्यात आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, खा. नारायण राणे आदी ४० नेते प्रचार करणार आहेत. प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी या निवडणुकीसाठी पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

### कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री यांना हायकोर्टाचा धक्का

बंगळुरू: कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांना लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण प्रकरणी गुरूवारी मोठा धक्का बसला. कर्नाटक उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाच्या (कनिष्ठ न्यायालय) आदेशाला कायम ठेवले असून, येडियुरप्पा यांच्यावर खटला चालवण्यास आणि त्यांना समन्स बजावण्यास सहमती दर्शवली आहे. या खटल्याची सुनावणी पुढे चालू ठेवण्याची परवानगी देताना, उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाला निर्देश दिले आहेत की, ''येडियुरप्पा यांची व्यक्तिशः उपस्थिती आवश्यक नसल्याशिवाय त्यावर आग्रह धरू नये. आवश्यक नसताना त्यांच्या वतीने दाखल होणाऱ्या कोणत्याही सवलत अर्जाचा विचार करावा. केवळ कार्यवाहीसाठी त्यांची उपस्थिती अत्यावश्यक असेल, तेव्हाच त्यांना हजर राहण्याची सक्ती करावी.

# आज बिहार विधानसभेचा निकाल



**पाटणा । वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालाची उत्सुकता आता शिगेला पोहोचली असून, आज मतमोजणी केली जाणार आहे. ११ नोव्हेंबर रोजी दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष निवडणूक निकालाकडे लागले आहे. ही मतमोजणी शुक्रवारी, १४ नोव्हेंबर रोजी होणार असून, सायंकाळपर्यंत अंतिम निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळानुसार, मतमोजणीला ▶▶ पान २ वर

# मेळघाटात सहा महिन्यांत ६५ बालकांचा कुपोषणाने मृत्यू

## प्रशासनाचा हलगर्जीपणा; हायकोर्टाची तीव्र नाराजी

**मुंबई । प्रतिनिधी**


एकट्या मेळघाटात कुपोषणामुळे गेल्या सहा महिन्यांत ६५ बालकांचा मृत्यू होणे ही अतिशय गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त करीत हायकोर्टाने आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच महाराष्ट्रातील दुर्गम भागात होणाऱ्या बालमृत्यूंबाबत मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त करत राज्य सरकारची चांगलीच खरडपट्टी काढली.

### राज्य सरकारने गांभीर्याने पाहावे

ही अत्यंत दुर्दैवी स्थिती आहे, सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा सरकारकडून हलक्यात घेतला जात असल्याचे कोर्टाने यावेळी नमूद केले. आदिवासी भागात तैनात असलेल्या डॉक्टरांना अधिक वेतन द्या, जेणेकरून तेथील परिस्थिती लक्षात घेता डॉक्टरांना काही प्रोत्साहन मिळेल, असे स्पष्ट करत याबाबत राज्य सरकारची काही जबाबदारी असायला हवी, त्यांची याबाबत स्वतंत्र यंत्रणा असायला हवी, अशी सूचनाही हायकोर्टाने केली.

संबंधित उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना कोर्टापुढे हजर राहण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू हे अत्यंत भयंकर असून, सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे एकाच भागात गेल्या सहा महिन्यांत दरमहा ११ बालकांचा नाहक बळी गेला.



यावरून या गंभीर समस्येकडे पाहण्याचा राज्य सरकारचा दृष्टिकोन अत्यंत बेजबाबदार असल्याचे स्पष्ट होते, अशा शब्दांत फटकारत हायकोर्टाने याप्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास, महिला ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३३.०० क्विंटल | २,२०१ | २,८०० | २,५६७ |
| ज्वारी/हायब्रिड: ५३.५० क्विंटल | २,००० | ३,३७६ | २,७७२ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ८.५० क्विंटल | ६,५६१ | ६,५६१ | ६,५६१ |
| उडीद : ३.०० क्विंटल | ४,६०० | ४,६०० | ४,६०० |
| बाजरी: ४०.०० क्विंटल | २,३०० | २,९०५ | २,६५६ |
| मुग: ०.५० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीन:१८८.५० क्विंटल | ४,३०० | ४,७३५ | ४,६४९ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,५०० | ६,९०० | ६,२०० |

अग्रलेख

# बिहारचा आजचा कौल दिशा देणारा

बिहार विधानसभा निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे. बिहार भाजप प्रणीत एनडीएच्या ताब्यात राहतो, नितीश कुमार बिहारचे मुख्यमंत्री म्हणून दहाव्यांदा शपथ घेतात की त्यांचा महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्याच बरोबर काँग्रेस महाआघाडी व प्रशांत किशोर यांना बिहारमधून कशी साथ मिळते हेही औत्सुक्य आहे. दुसऱ्या टप्प्यात विक्रमी मतदान झाले, तेव्हा मतदानोत्तर चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांचे निष्कर्ष जाहीर झाले आहेत. त्यामध्ये एनडीए सरकार पुन्हा बहुमताने येणार असे दिसते आहे. महागठबंधन व प्रशांत किशोर सत्ताप्राप्तीसाठी अपयशी ठरणार असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अनेकदा असे अंदाज चुकीचे ठरले आहेत. ओघानेच १४ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतमोजणीतून कोणता निकाल बाहेर येतो हे बघावे लागेल.

बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल १४ नोव्हेंबरला जाहीर लागणार आहेत. या निवडणुकीत दोन आघाड्यांमध्ये सत्ताधारी एनडीए आणि महागठबंधन यांच्यात प्रमुख लढत आहे. तिसरा पक्ष म्हणजे राजकीय रणनितीकार प्रशांत किशोर यांचा जनसुराज पक्ष. प्रशांत किशोर या निवडणुकीत प्रथमच नवा पक्ष स्थापन करुन रिंगणात उतरले आहेत पण अंदाज व्यक्त झालेत त्यात त्यांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागेल असे दिसले आहे. एनडीए आघाडीत पाच पक्षांचा समावेश आहे. २४३ जागांची बिहार विधानसभा निवडण्यासाठी भाजप आणि जेडीयू प्रत्येकी १०१ जागांवर निवडणूक लढवत आहेत. तर लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) २९ जागांवर आणि राष्ट्रीय लोक मोर्चा (आरएलएम) व हिंदुस्तानी आवाम मोर्चा (एचएएम) प्रत्येकी ६ जागांवर निवडणूक लढवत आहेत. महागठनबंधनमध्ये मोठा घोळ आणि एकवाक्यता नव्हती. ओघानेच जागा वाटपाची अधिकृत घोषणा झाली नाही. प्रचारात सुसुत्रताही नव्हती. महागठबंधनमध्ये राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, सीपीआय (एम-एल), सीपीआय आणि विकासशील इंसान पार्टी (वीआयपी) यांचा समावेश होता. आरजेडी १४३ जागांवर, काँग्रेस ६१ जागांवर, सीपीआयएमएल २० जागांवर, वीआयपी १३ जागांवर, सीपीआय (एम) ४ आणि सीपीआय ९ जागांवर निवडणूक लढवत होती. बिहार निवडणुकीत मतदान संपल्यानंतर वेगवेगळे एक्झिट पोल्स येऊ लागले आहेत, यात बहुतेक एक्झिट पोल्समध्ये एनडीए आघाडीच्या विजयाचे दावे करण्यात आले आहेत. अनेकदा एक्झिट पोल्स आणि अंतिम निकालांमध्ये फरक दिसून आलेला आहे. त्यामुळे हे कल म्हणजे अंतिम निकाल नाहीत हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत लाडकी बहिण योजना यशस्वी ठरली तशी बिहारमध्ये महिलांना नुकत्याच झालेल्या निवडणूक काळापूर्वी, नितीश कुमार यांच्या सरकारने मुख्यमंत्री महिला रोजगार योजना अंतर्गत सुमारे २५ लाख महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी १०,००० रुपये हस्तांतरित केले. ही रक्कम थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने देण्यात आली. एकूण सुमारे रुपये २,५०० कोटींचे वाटप करण्यात आले. ही योजना महिलांना स्व-रोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. ओघानेच या योजनेची हवा झाली आहे. त्याच जोडीला जंगलराज नको हा प्रचारही जोर धरून होता. या वेळच्या बिहार निवडणुकीचे वैशिष्ट्या म्हणजे भाजपने जोरात ताकद लावली असली आणि मतदारयादी व्यवस्थापन नेटके केले असले तरी एनडीएचा निवडणूक चेहरा म्हणून नितिशकुमार यांनाच प्रोजेक्ट केले होते. कदाचित केंद्रसरकारमधील नितिशकुमार यांच्या पाठिंब्याची गरज हे कारण असू शकेल, पण भाजप अन्य सर्व निवडणुकांत मोदी विरुद्ध विरोधक असे चित्र उभे करते आणि मोदीचा चेहरा प्रचारात ठळक वापरते. तसे यावेळी दिसले नाही. भाजपाने पक्ष म्हणून आपले सारे बळ प्रचारात उतरवले होते. स्वयंसेवकही मदतीला होते आणि ना, मोदी, फडणवीस, राजनाथसिंह ते देवेंद्र फडणवीस व योगीपर्यंत सारे एका सुरात भाषणे देत होते. त्यांचा प्रभाव दिसला. तुलनेने महाआघाडीत सुसुत्रता आणि सुसंवाद दिसला नाही. बिहार विधानसभा निवडणुकीत यावेळी सुमारे दहा टक्के मतदान जास्त झाले आहे आणि महिलांनी मतदान मोठ्या प्रमाणात केले आहे. हा वाढीव दहा टक्के हिस्सा कुणाच्या पारड्यात पडतो, यावर बिहारचा कौल निश्चित होईल असे मानले जात असले तरी २५ लाख महिलांना प्रत्येकी दहा हजार रुपये वाटप हेच यामागचे कारण आहे, हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही. बिहारमध्ये जातीय समीकरणे विजयासाठी महत्त्वाची असणाऱ्यात मुलगी आणि मत जातीतच द्यावे असे बोल तेथे ऐकू येत होते. देशभर सगळीकडेच हेच सूत्र ठळक होते आहे.

१४ तारखेला पहिले पंतप्रधान, काँग्रेस नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंतीदिन आणि बालदिन आहे. काँग्रेस महाआघाडीला मोठा पराभव पत्करावा लागला तर त्याचे राजकीय परिणाम देशभर उमटतील अन् काँग्रेसला नेतृत्व आणि दिशा यावर विचार करावाच लागेल.

भाजप व मित्राची एनडीए महायुती जिंकणार, सत्ता राखणार, नितिशकुमार बिहार मुख्यमंत्री म्हणून दहाव्यांदा शपथ घेणार असे तर्क लढवले जात आहेत. एनडीएला १३८ ते १६९ जागा दाखवण्यात आल्या आहेत तर महागठबंधनला ९० ते १०८ जागा दाखवण्यात आल्या आहेत. भाजप हा ६५ ते ७० जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरेल आणि प्रशांत किशोरांचा पक्ष जेमतेम खाते उघडेल असे अंदाज व्यक्त झाले आहेत. विविध एक्झिट पोल त्यांची सॅम्पल्स यांचा या तर्कामागे आधार आहे. अंदाज व तर्क अनेकदा फसतात, मतदार नेहमीच चकवा देतात. त्यामुळे निकाल काय येतो यावर पुढची सारी गणिते ठरतील. मोदींनी मी शपथविधी समारंभाला येणार अशी घोषणा प्रचार समाप्ती सभेत केली होती, हे लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्रात आणि देशात मतचोरी आणि निवडणूक आयोग यासंदर्भात आरोप, मोर्चे यांनी रान तापवले गेले आहे. बिहारचा कौल एनडीएच्या बाजूने आला तर हा आवाज मोठा होईल पण लोकशाहीत हे चालणारच.

## नामदेवराव शिंदे यांचा अमृत महोत्सवी सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

**सेवानिवृत्त बँक कॅशियर नामदेवराव शिंदे यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस बीड येथे त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने बुधवार दिनांक १३ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला.**



यावेळी उपस्थित चव्हाण यांनी शिंदे यांना शुभेच्छा देताना, नामदेव शिंदे हे हैदराबाद बँकेतील सेवानिवृत्त बँक कर्मचारी असून त्यांनी आपल्या सेवाकाला अत्यंत प्रामाणिक इमानदारीने आणि कार्यतत्पर कर्मचारी म्हणून कर्तव्य बजावले. शौन्यवृत्तीनंतरही ते अनेक सामाजिक उपक्रमात सहभागी घेत आहेत. परोपकार, सेवा भावीवृत्ती आणि सज्जन व्यक्तिगत व्यक्तिमत्व म्हणून ते सुप्रीत आहेत. समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन ते सातत्याने अनेकांना मदत करतात. सदाबहार प्रसन्न आणि चंचल व्यक्तिमत्व असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे, असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. यावेळी नगरपालिकेचे माजी सभापती भास्कर जाधव, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी रामनाथ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी मुंडे, डॉ. शिवाजी चव्हाण, रमेश शिंदे,विलास गव्हाणे, विठ्ठल तिपाले, ठाकूर, पत्रकार नारायण नागरे आदींची उपस्थिती होती.

## कवडगावातून अशोक निपटे यांना मिळू शकते उमेदवारी!

### गेल्या निवडणुकीत घ्यावी लागली होती माघार, यावेळी दादांची 'होकार' शिक्कामोर्तब?

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कवडगाव पंचायत समिती गण सर्वसाधारणसाठी खुला असून या गणातून लोकप्रिय नेते, आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे विश्वासू सहकारी आणि पिंपरखेडचे विद्यमान उपसरपंच तसेच ख्यातनाम पत्रकार अशोक निपटे यांना उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा सध्या जोरात रंगली आहे. गेल्या निवडणुकीत निपटे यांना ऐनवेळी माघार घ्यावी लागली होती. त्यामुळे या वेळी ''दादांची मान्यता मिळणार का?'' या प्रश्नाने संपूर्ण गणात उत्सुकता पसरली आहे.**

सन २०१२ साली निपटे यांनी पहिल्यांदा उमेदवारी मागितली होती. त्यावेळी स्थानिक नागरिक आणि पत्रकारांनी मोठ्या प्रमाणात त्यांच्याबाबत जनआंदोलन केले होते. आमदार प्रकाशदादा सोळंके यांनाही पत्रकारांनी भेट घेऊन उमेदवारी देण्याची विनंती केली होती. त्यावेळी उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात होती, पण शेवटच्या क्षणी निर्णय बदलला गेला आणि पक्षालाही त्याचा फटका बसला.यानंतर अशोक निपटे यांनी निराश न होता गावाच्या विकासाची वाट पकडली. सरपंच म्हणून आणि आता उपसरपंच म्हणून त्यांनी पिंपरखेडचा कायापालट केला. आमदार प्रकाशदादा सोळंके, धैर्यशील काका सोळंके आणि युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केले. कवडगाव पंचायत समिती गणातील कवडगाव, मोरेवाडी, देवडी, खळवट, लिमगाव, काडीवडगाव, चिंचवडगाव, खापरवाडी आणि पिंपरखेड या गावांमध्ये निपटे यांचे नाव लोकांच्या मनात ठळकपणे आहे. त्यांच्या पत्रकारितेतील अनुभवामुळे प्रशासनात चांगली



वचक असून, पंचवीस वर्षांच्या सातत्यपूर्ण समाजसेवेचा ठसा त्यांच्या कार्यावर उमटलेला आहे. मागील वेळेसची संधी हुकल्याने यावेळी मात्र ''अशोक निपटे यांनाच उमेदवारी मिळावी'' अशी जोरदार मागणी शेतकरी व सामान्य नागरिकांतून होत आहे. या जनभावनेचा विचार करून आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्याकडून निपटे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता प्रबळ असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. या संदर्भात अशोक निपटे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले.''प्रकाशदादा सोळंके यांचे नेतृत्व आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. दादा आणि जयसिंग भैय्या जो निर्णय घेतील तोच आमच्यासाठी अंतिम असेल. उमेदवारी मिळाल्यास आम्ही शंभर टक्के विजयी होऊन दादांच्या आणि भैय्यांच्या नेतृत्वाखाली या भागाचा कायापालट करू,'' अशी ठाम भूमिका निपटे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

## आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजला तृतीय पारितोषिक

**बीड । प्रतिनिधी**

**श्री सरस्वती भुवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेली विभागीय सकाळ करंडक अंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा शनिवारी जल्लोषात संपन्न झाली. ७ व ८ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यांमधून मिळून ८ संघ सहभागी झाले होते.**

या महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या विद्यार्थिनींनी आपल्या अभिनयातून ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाण्याच्या समस्येबाबत जागरूकता निर्माण केली. त्यांच्या 'पाझर' या हृदयस्पर्शी एकांकिकेने परीक्षकांची मनं जिंकत तिसरे स्थान मिळवले. नाट्यप्रयोगात अंधश्रद्धेला तिलांजलि देत, रणरागिनींनी पाणी मिळवण्यासाठी केलेला संघर्ष प्रभावीपणे सादर केला. उत्कृष्ट अभिनय, प्रभावी संवाद आणि दिग्दर्शनामुळे 'पाझर' ने परीक्षक तसेच प्रेक्षकांवर ठसा उमटवला. एकांकिकेचे लेखन प्रवीण पाटेकर यांनी केले असून, दिग्दर्शन संतोष पैठणें यांनी केले. नाटकातील भूमिका सीमा प्रजापती, वनिता सवणे, रोशनी चव्हाण, तुपसागर अपर्णा, अंधारे निकिता, आकांक्षा शेटे, काकडे अर्पिता यांनी साकारल्या. या विजयामुळे महाविद्यालय परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले असून, शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. प्राचार्य डॉ. अश्विनी बेंद्रे, प्राध्यापक आणि सहविद्यार्थ्यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. डॉ.सुनील जोंधळे, संघप्रमुख प्रा. सुप्रिया ससाने यांच्या नेतृत्वाखाली संघाने उत्कृष्ट कामगिरी बजावली.

## अनैतिकसंबंधमुळे लहान भावाकडून मोठ्या भावाचा खून

**जालना । प्रतिनिधी**

अनैतिक संबंधामुळे संबंधात अडथळा ठरणाऱ्या भावाचा भावानेच केला खून याप्रकरणी आरोपीला पोलिसांनी केले अटक सदरील घटना बदनापूर परिसरात घडली आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे बदनापूर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ज्ञानेश्वर राम तायडे (२८) आणि मनिषा परमेश्वर तायडे (२५) अशी अटक आरोपींची नावे आहेत. बदनापूर तालुक्यातील सोमठाणा येथील मनिषा तायडे हिचे सख्खा लहान दीर ज्ञानेश्वर तायडे याच्यासोबत अनैतिक प्रेमसंबंध होते. या संबंधात पती परमेश्वर राम तायडे (३०) हा अडथळा ठरत होता. यामुळे ज्ञानेश्वर आणि मनिषाने मिळून १५ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास परमेश्वरवरची कुऱ्हाडीने डोक्यात व चेहऱ्यावर वार करत आणि मफलरने गळा आवळून हत्या केली. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचा मृतदेह प्लास्टिकच्या मुरघासच्या भोतात भरून दोरीने बांधले. यानंतर दगड बांधून वाला-सोमठाणा तलावात फेकून दिले. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी बदनापूर हद्दीतील निकळज शिवारामधील वाल्हा-सोमठाणा तलावात प्लास्टिकच्या मुरघासच्या भोतात गुंडाळलेले



एक अज्ञात प्रेत आढळून आले. याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक हे तात्काळ पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला आणि ओळख पटविल्यावर तो परमेश्वर राम तायडे हा सोमठाणा येथील रहिवासी असल्याचे समोर आले.

## पान १ वरून...

### तब्बल ३२ कारने देशभरात

ब्रेझा, स्विफ्ट डिझायर, इकोस्पोर्ट आणि आय २० सारख्या गाड्यांचा समावेश आहे. १० नोव्हेंबर रोजी लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या स्फोटात तेरा जणांचा मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी एका जखमीचा मृत्यू झाला. २० जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. एनआयए, एनएसजी, आयबी आणि दिल्ली पोलिसांनंतर, ईडी दिल्ली लाल किल्ला स्फोटात सहभागी असलेली पाचवी तपास संस्था बनली आहे. डॉक्टरांनी स्फोटके खरेदी करण्यासाठी २.३ दशलक्ष रुपये कुठून जमवले याची अंमलबजावणी संचालनालय चौकशी करेल. ईडी अल-फलाह विद्यापीठाच्या व्यवहारांचीही चौकशी करेल. तपास यंत्रणेतील सूत्रांचा दावा आहे की, आरोपी डॉ. मुझम्मिल, डॉ. आदिल, उमर आणि शाहीन यांनी मिळून अंदाजे २० दशलक्ष रुपये जमवले, जे त्यांनी उमरला दिले. या व्यक्तींनी आयईडी तयार करण्यासाठी गुरुग्राम, नूह आणि आसपासच्या भागातून ३ लाख रुपयांचे २० क्विंटलपेक्षा जास्त एनपीके खत खरेदी केले. उमर आणि मुझम्मिलमध्ये आर्थिक वादही झाला होता.

**चार वाहने कोणती?**

आतापर्यंत, तपासात चार वाहने आढळून आली. एक मारुती स्विफ्ट आहे, जी डॉ. शाहीन यांच्या नावावर नोंदणीकृत आहे. दुसरी पांढ-या रंगाची आय २० आहे, ज्याचा वापर स्फोटात करण्यात आला. तिसरी गाडी लाल रंगाची इकोस्पोर्ट आहे, ज्याचा तपास अजूनही सुरू आहे आणि आता ब्रीझा जी अल-फलाह विद्यापीठाच्या पार्किंगमधून जप्त करण्यात आली.

-------------------

### उद्यापासून सोयाबीन, मूग,

'एनसीसीएफ'च्या खरेदी केंद्रावर जाऊन नोंदणी करावी. नोंदणी ही ऑनलाइन पद्धतीने पीओएस मशीनद्वारे करण्यात येणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी आधारकार्ड, बँक पासबुक, चालू वर्षाचा सातबारा उतारा, पीकपेरा आदी कागदपत्रांसह प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. एसएमएस प्राप्त झाल्यानंतरच शेतीमाल विक्रीकरिता खरेदी केंद्रावर आणावा लागणार आहे. विविध अडचणी पाहता शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर सुविधा देण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांनी सोयाबीन, उडीद, मुगाच्या विक्रीसाठी नोंदणीत सहभाग घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

------------

### प्रचारात जेवणाचे दर

खर्चाच्या नोंदीसाठी रजिस्टर दिले जाते. त्या रजिस्टरमध्ये उमेदवारास निवडणूक काळातील खर्च दैनंदिन नोंद बंधनकारक आहे. बैठका, रॅली, सभा आणि जाहिराती, पोस्टर्स, वाहनांचा खर्च यामध्ये समाविष्ट आहे. कार्यकर्त्यांना जेवणासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाची नोंदही या रजिस्टरमध्ये करावी लागणार आहे. चहा, नाश्ता, जेवणाचे दर निश्चित केले आहेत. या दरापेक्षा कमी दर ग्राह्य धरले जाणार नाहीत. ज्या उमेदवारांना निवडणूक काळात अंगरक्षक पाहिजे आहे. त्यांना प्रत्येक दिवसासाठी एक हजार रुपये दर आकारला जाणार आहे. निवडणूक खर्चामध्ये हा खर्च धरला जाणार आहे.

---------

### राज्यभरात सीईटी कक्षाची

प्रवेशासाठी ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा व ७३ अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. हे प्रवेश ५७०० पेक्षा जास्त शैक्षणिक संस्थामधून दिले जातात. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून प्रवेश मान्यतेची प्रक्रिया राबविण्यात येते. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी यावर्षी १४ लाख विद्यार्थी सहभागी झाले. पुढील वर्षीच्या प्रवेशाची तयारी सुरु आतापासूनच झाली आहे. राज्यातील कोणत्याही विद्यार्थ्याला सीईटी परीक्षा, निकाल, दस्तऐवज पडताळणी किंवा प्रवेशासंबंधी तक्रार असल्यास त्याला थेट मुंबईतील सीईटी कक्षाशी संपर्क साधावा लागत होता. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि प्रयत्न वाया जात होते. या पार्श्वभूमीवर विभागाने सर्वच जिल्ह्यांमध्ये मदत केंद्रांची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. या केंद्रांमधून विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी लागणाऱ्या सर्व तांत्रिक टप्प्यांचे मार्गदर्शन मिळेल. लॉगिन, अर्ज भरणे, शुल्क भरणे, अपलोडिंग, पर्याय क्रमांक निश्चिती, दस्तऐवज पडताळणी, तसेच आरक्षणाशी संबंधित तांत्रिक शंका यावर प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून थेट सहाय्य दिले जाणार आहे. शिवाय, विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचे निराकरण स्थानिक स्तरावरच करण्यात येईल, हे या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असणार आहे.

----------

### परळी वीज केंद्र ठप्प; राज्यातील

आहे. जास्त खर्चिक युनिट बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या महाजेनको या वीज उत्पादन कंपनीकडे एकूण सात औष्णिक वीज केंद्रे आहेत. चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, परळी, पारस, भुसावळ आणि नाशिक या केंद्रांची एकत्रित उत्पादन क्षमता १०,८४२ मेगावॅट आहे. मात्र, मागणी घटल्याने केवळ ५,१८७ मेगावॉट उत्पादन घेतले जात आहे. महावितरण क्षेत्रात बुधवारी विजेची मागणी २१,३८४ मेगावॉट इतकी नोंदली गेली, तर राज्यात उपलब्धता ३३,२८१ मेगावॉट आहे. या पार्श्वभूमीवर झिरो शेड्यूल आणि आर.एस.डी. या योजनेंतर्गत अनेक युनिट बंद करण्यात आली आहेत. परळी औष्णिक वीज केंद्रातील सर्व तीन युनिट बंद ठेवण्याचा निर्णय झाला आहे. चंद्रपूर येथील पाच आणि भुसावळ येथील तीन युनिट बंद आहेत. कोराडी आणि नाशिक येथील प्रत्येकी एक युनिट इतर कारणांमुळे बंद ठेवण्यात आली आहे.

------------

### शरद पवारांना डोके दुखी ठरणारी

मिळालेल्या पिपाणी या साधर्म्य असणाऱ्या चिन्हामुळे मोठा फटका राष्ट्रवादीला बसला. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला दोन निवडणुकीत दणका बसल्यानंतर आता निवडणूक आयोगाकडून हे चिन्ह रद्दबातल करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आनंद व्यक्त करतानाच निवडणूक आयोगाला खोचक टोला लगावला आहे. त्यांनी ट्विट करत प्रतिक्रिया देत तुतारी चिन्ह कायमचे वगळल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार मानताना खडे बोल सुद्धा सुनावले आहेत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या चिन्हामुळे कार्यकर्त्यांना आणि मतदारांना मोठा गोंधळ निर्माण झाला, त्याची राजकीय किंमत पक्षाला चुकवावी लागली होती. हा निर्णय जर आधीच घेतला गेला असता, तर आज महाराष्ट्रातील आणि देशातील राजकीय चित्र नक्कीच वेगळे असते. शशिकांत शिंदे यांनी ट्विट करत म्हटले आहे की, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या चिन्हामुळे कार्यकर्त्यांना आणि मतदारांना मोठा गोंधळ निर्माण झाला, त्याची राजकीय किंमत पक्षाला चुकवावी लागली होती. हा निर्णय जर आधीच घेतला गेला असता, तर आज महाराष्ट्रातील आणि देशातील राजकीय चित्र नक्कीच वेगळे असते. शेवटी, उशिरा सुचलेले शहाणपण असे याला म्हणावे लागेल. निवडणूक चिन्हातून 'पिपाणी (ट्रम्पेट)' हे चिन्ह कायमचे वगळल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार! हा निर्णय लोकशाही आणि स्वच्छ निवडणूक प्रक्रियेसाठी एक सकारात्मक पाऊल आहे, असे त्यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

-------------

### वाळू माफियांचा महसूल पथकावर

लोडर वाहनाखाली चिरडण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला वेळीच वाचवले. यातील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले. आष्टी तालुक्यातील हिंगणीजवळील सीना नदीच्या पात्रातून बेकायदेशीर वाळू उत्खनन होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर तहसीलदार वैशाली पाटील यांनी त्यांच्या पथकासह छापा टाकला. कारवाईदरम्यान, एक बॅकहो लोडर मशीन, तीन ट्रॅक्टर, एक ट्रॅक्टर ट्रॉली आणि ३० ब्रास वाळू जप्त करण्यात आली. ज्यांची एकूण किंमत ५१ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. जप्त केलेल्या वस्तू महसूल विभागाचे पथक तहसील कार्यालयात नेत असताना, आष्टी शहरात एका पांढऱ्या कारने त्यांचा मार्ग अडवला. जप्त केलेली वाहने आणि साहित्य परत मिळवण्यासाठी तीन जणांनी गाडीतून उतरून तहसीलदार पाटील आणि इतर कर्मचाऱ्यांवर हल्ला केला. एका हल्लेखोराने बॅकहो लोडर वाहन चालवणाऱ्या तलाठी सचिन तेलंग यांना ढकलले. तर, दुसऱ्याने साक्षीदार सूरज कोकणे यांना ढकलले. त्यानंतर त्यांच्या तिसऱ्या साथीदाराने लोडर वाहन थेट तेलंगकडे वळवून त्याला मारण्याचा प्रयत्न केला. तथापि, महसूल पथकाच्या इतर सदस्यांनी त्यांना सुरक्षित ठिकाणी नेल्याने ते वाचले. दरम्यान, दोन कारमधून आणखी चार जण घटनास्थळी पोहोचले आणि जप्त केलेले ट्रॅक्टर रोखण्यासाठी प्रयत्न केला. त्यानंतर झालेल्या गोंधळात हल्लेखोरांनी तलाठी प्रवीण शिंदे यांच्याकडून जप्त केलेला एक ट्रॅक्टर जबरदस्तीने घेऊन जाण्यात यश मिळवले. पोलिसांच्या माहितीनुसार, महसूल पथकाला अखेर बॅकहो लोडर वाहन आणि त्याचा चालक महेश आसावर यांना पकडण्यात यश आले.

---------------

### मेळघाटात सहा महिन्यांत ६५

आणि बाल कल्याण तसेच वित्त विभागाच्या प्रधान सचिवांना २४ नोव्हेंबरच्या पुढील सुनावणीला कोर्टापुढे हजर राहण्याचे आदेश जारी केले आहेत. मेळघाट आणि अन्य आदिवासी भागातील मुलांचा आजही कुपोषणामुळे मृत्यू होत आहे. तसेच तेथील नागरिकांना इतरही गंभीर समस्या भेडसावत आहेत. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात डॉ. राजेंद्र बर्मा आणि सामाजिक कार्यकर्ते बंडू साने यांच्यासह विविध जनहित याचिका दाखल करण्यात आल्या असून, या याचिकांवर बुधवारी न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्यासमोर सुनावणी पार पडली. तेव्हा राज्य सरकारच्या वैद्यकीय विभागाकडून तज्ज्ञांच्या एका समितीने मेळघाट, चिखलदरा, धारणी परिसरात भेट दिली होती. याबाबत धारणी, चिखलदरा येथे काही बैठकाही पार पडल्या. त्या बैठकीत मेळघाटमधील विविध समस्या, औषधे, वैद्यकीय सुविधा, डॉक्टरांची संख्या, त्यांची उपस्थिती, स्थानिक पातळीवरील उपाययोजना यांवर चर्चा करण्यात आल्याची माहिती देताना त्याबाबत फोटोही राज्याच्या वतीने कोर्टासमोर सादर केले गेले होते. मात्र, मेळघाट परिसरात आजही स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञांची जागा रिक्त असल्याची माहिती याचिकाकर्ते बंडू साने यांनी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. जिल्हाधिकाऱ्यांकडून स्थानिक पातळीवर आणि नागरिकांशी संपर्क साधला जात नाही. तसे केले तरच समस्यांवर तोडगा काढणे शक्य होईल, अशा शब्दांत याचिकाकर्त्यांनी हायकोर्टाकडे तक्रार केली.

-------

### आज बिहार विधानसभेचा निकाल

सकाळी ८ वाजल्यापासून सुरुवात होईल. मतमोजणी पूर्ण होऊन अंतिम निकाल जाहीर होण्यास संध्याकाळपर्यंतची वेळ लागण्याची शक्यता आहे. दोन टप्प्यांत झालेल्या या निवडणुकीत मतदारांचा मोठा उत्साह दिसून आला. प्रमुख राजकीय पक्ष आणि आघाड्यांनी जोरदार प्रचार केल्यामुळे ही निवडणूक अटीतटीची मानली जात आहे. निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यात ६६.९१% इतके विक्रमी मतदान झाले, जे १९५१ नंतर बिहारमधील सर्वाधिक मतदान असल्याची नोंद निवडणूक आयोगाने केली आहे. दरम्यान, मतदान पूर्ण होताच जाहीर झालेल्या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, एनडीए आघाडीला बहुमतापेक्षा अधिक जागा मिळण्याचा स्पष्ट अंदाज आहे. एकूण २४३ जागा असलेल्या विधानसभेत बहुमतासाठी १२२ जागांची आवश्यकता आहे, परंतु एक्झिट पोलमध्ये एनडीएला त्याहून अधिक जागा मिळण्याचे संकेत आहेत. या उलट, राष्ट्रीय जनता दलाच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला १०० किंवा त्याहून कमी जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५



## थोडक्यात....

### बाळासाहेब देशपांडे यांची मलेशिया येथे आयोजित एज्युकेशन टूर्ससाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

बाळासाहेब देशपांडे हे माजलगाव व परिसरात विमा सल्लागार



म्हणून कार्यरत आहेत त्यांनी गेले ३० वर्षापासून एलआयसी व्यवसाय विमा सल्लागार म्हणून काम करत आहेत मागील आर्थिक वर्षात चांगला व्यवसाय केल्यामुळे एल.आय.सी. कडून मलेशिया येथे आयोजित करण्यात आलेल्या एज्युकेशन टूर्स साठी त्यांच्या चांगल्या कामाची पावती म्हणून त्यांची निवड करण्यात आलेली आहे त्यांची यापूर्वीही विमा सल्लागार म्हणून काम करत असताना एलआयसी कडून अनेक वेळेस त्यांना एम. डी. आर.टी. साठी अमेरिका येथे जाण्याचा बहुमान मिळालेला आहे त्यामुळे बाळासाहेब देशपांडे हे एल.आय.सी .कडून विशेष एज्युकेशन टूर्स साठी पात्र झाल्यामुळे ते मलेशिया येथे रवाना होताना त्यांच्या यशाबद्दल एल.आय.सी. शाखा माजलगाव येथील शाखेचे शाखाआधिकारी सुशांत कातनेश्वरकर, सुजित घुगे, रत्नपारखी, बक्षी, शाखेतील सर्व कर्मचारी व ॲड. एन .व्ही नाईकवाडे या सर्वांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच त्यांना विमा प्रतिनिधीसह सामाजिक, राजकीय अशा इतर विविध वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक मान्यवर व त्यांचे मित्र परिवाराकडून अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आले.

### अनिल राधे मित्रपरिवारातर्फे मूकबधिर शाळेत स्नेहभोजन



माजलगाव । प्रतिनिधी

अनिल राधे मित्रपरिवाराकडून माजलगाव येथील मूकबधिर शाळेत स्नेहभोजनाचा उपक्रम राबवून सामाजिक कार्यात नवा आदर्श घालण्यात आला. हा उपक्रम शुभम महात्मे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या निमित्ताने केवळ स्नेहभोजनच नव्हे, तर दिवसभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.त्यामध्ये माजलगाव ग्रामीण रुग्णालयात फळवाटप,जिल्हा परिषद शाळा ब्रह्मगाव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप,तसेच गरजू महिलांना साड्यांचे वाटप असे उपक्रम पार पडले.शुभम महात्मे हे माजलगाव तालुक्यातील एक उत्साही,तरुण सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. समाजातील प्रत्येक घटकासाठी योगदान देण्याची त्यांची वृत्ती कायमच दिसून येते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त समाजहिताचे उपक्रम राबवून मित्रपरिवाराने त्यांना एक वेगळी ओळख दिली आहे.या कार्यक्रमात अनिल कांबळे, अजय शिंदे,प्रविण खराडे,दशरथ कांबळे,गणेश जगताप,किरण नाईकनवरे,प्रदीप फंदे,विलास लोंढे, अंजन कांबळे, सिद्धेश्वर कांबळे, प्रदीप कांबळे,यश तौर व प्रवीण कांबळे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.दरम्यान, तालुक्यातील विविध सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, सरपंच,उपसरपंच व पंचायत समिती सदस्यांनी शुभम महात्मे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# बोगस शिक्षक भरतीतील घोटाळेबाजांना पहिला दणका

## आष्टीतील प्रकरणात बीड माध्यमिकचे तत्कालिन शिक्षणाधिकारी, तत्कालिन शिक्षण उपसंचालक, मुख्याध्यापक, शिक्षकांसह अठरा जणांवर गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी

बनावट कागदपत्रांच्या आधारे बोगस शिक्षक भरती करून एका शिक्षकाला काही काळ काम केल्यानंतरही नियमबाह्यपणे बडतर्फ करण्यात आले. यानंतर या शिक्षकाने न्यायालय, माहिती आयोगाकडे दादा मागितली, चौकशीत कागदपत्रांवरून बोगस या आठरा जणांवर झाला गुन्हा दाखल



बीड माध्यमिकचे तात्कालिन शिक्षणाधिकारी, छ. संभाजीनगरचे तात्कालिन शिक्षण उपसंचालकांसह मुख्याध्यापक तुकाराम डोके, लिपीक कल्याण पोकळे, संस्थेचे सदस्य नानासाहेब घोलप, श्रीनिवास पोकळे, विजयकुमार मुटकुळे, अमृता नवले, जयश्री काळे, मंगल बोरूडे, सतिश जगताप, तात्याभाऊ पोकळे, अनिल ढोबळे, शोभा जीवे, शितल पोकळे, सुनिता पोकळे, बाबासाहेब वाडेकर, अनुराधा भगत यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे.बोगस शिक्षक

भरती झाल्याचे समोर आल्यानंतर याप्रकरणी संस्थेचे पदाधिकारी, बोगस शिक्षकांसोबतच छत्रपती संभाजीनगरचे तात्कालिन शिक्षण उपसंचालक, बीड माध्यमिकचे तात्कालिन शिक्षणाधिकाऱ्यांसह १८ जणांविरोधात आष्टी पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यामुळे शिक्षण विभागातील घोटाळेबाजांचे धाबे दणाणले आहेत.

आष्टीतील तुकाराम गर्जे यांनी याप्रकरणी तक्रार दिली. ते रूरल डेव्हलपमेंट सेंटर फॉर युथ, अहिल्यानगर या संस्थेच्या वतीने आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथे चालणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत होते. मात्र संस्थेने त्यांना बडतर्फ केले. याप्रकरणी तक्रार दिली की, संस्थेने शाळेत चुकीच्या पध्दतीने शिक्षक भरती केली, भरतीची जाहिरात येण्याच्या आधीच शिक्षकांना रूजू करून घेतले होते. दोन शिक्षीका या शाळेतच येत नसतानाही त्यांच्या घरी जावून त्यांच्या सह्या घेत त्यांना पगार दिला जात होता. याबाबत त्यांनी अनेकदा तक्रारी केल्या, माहिती अधिकारात माहिती मिळविली व न्यायालयातही धाव घेतली. कशाप्रकारे बोगस शिक्षक भरती केली गेली तसेच बनावट कागदपत्रांआधारे गर्जना बडतर्फ केले याची माहिती दिली होती, यावरून १८ घोटाळेबाजांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये बीडच्या माध्यमिकचे तात्कालिन शिक्षणाधिकारी, छ. संभाजीनगरचे तात्कालिन शिक्षण उपसंचालांचाही समावेश आहे. दरम्यान या गुन्ह्यामुळेच शिक्षण विभागातील घोटाळेबाजांचे धाबे आता दणाणले आहेत.

### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यान आत्मनिर्भर भारत व आजचा युवक या विषयावर राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नागोराव वाघमारे यांनी रासेयो सेवकांना संबोधित करताना सांगितले की, आत्मनिर्भर भारत संकल्पना देशाच्या सक्षमीकरणासाठी कशाप्रकारे महत्त्वपूर्ण ठरणारी आहे हे सविस्तरपणे समजावून सांगितले. आत्मनिर्भर भारत यामध्ये युवकांचे योगदान महत्त्वाचे असून यामध्ये



सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वेच्छेने कार्य करावे असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी युवकांचे कार्य व योगदान आत्मनिर्भर भारत या संकल्पनेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणारे आहे. यामुळे राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी कार्य केल्यास देशाच्या विकासासाठी हातभार लागेल असे सांगितले. यानिमित्त विद्यार्थी व रासेयो स्वयंसेवकांना आत्मनिर्भरतेची याची शपथ कार्यक्रमाधिकारी प्रा. बाळासाहेब जोगदंड यांनी दिली. या निमित्ताने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले. तसेच स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसराची स्वच्छत निमित्ताने केली. याप्रसंगी विचार मंचावर डॉ. श्याम सरसरे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व रासेयो स्वयंसेवकांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी व्यक्त केले.

## पान ६ वरून...

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे हा प्रवेश सोहळा पडला. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसेना युवासेना शेतकरी सेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रवेश सोहळ्याचे प्रस्ताविक शिवसेना किल्लेधारूर तालुका प्रतिनिधी नारायण कुरुंद यांनी केले तर सूत्रसंचालन प्रतिक कांबळे यांनी केले.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसेना युवासेना शेतकरी सेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रवेश सोहळ्याचे प्रस्ताविक शिवसेना किल्लेधारूर तालुका प्रतिनिधी नारायण कुरुंद यांनी केले तर सूत्रसंचालन प्रतिक कांबळे यांनी केले.

### जिल्हा परिषदेत

पुढीलप्रमाणे कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कार्यकारी अभियंता बांधकाम (१) शिक्षणाधिकारी (प्रा.) प्रत्येकी १ आणि जिल्हा परिषद वाहनतळ तळमजला २ असे एकूण ८ सीसी. टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

### बीड नगराध्यक्षपदासाठी

आंबेडकरी चळवळीत कार्यरत असलेल्या खऱ्या मागासवर्गीय उमेदवाराला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ कागदपत्रांवरून अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असलेल्या महिलेला पुढे करून पक्षाने मागासवर्गीय समाजाची फसवणूक केल्याचा आरोप धनवे यांनी केला आहे. आंतरजातीय विवाह केलेल्या महिलेला उमेदवारी देऊन मागासवर्गीय समाजाच्या प्रतिनिधित्वाचा अवमान करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. हा प्रकार दलित समाजाचा विश्वासघात असल्याचे सांगत, धनवे यांनी खऱ्या आंबेडकरी चळवळीतील उमेदवाराला न्याय मिळावा, अशी मागणी केली जात आहे. अन्यथा, या अन्यायाचा निषेध म्हणून दलित समाज निवडणुकीत योग्य पक्षाला जागा दाखवून देईल, असा इशाराही त्यांनी पत्रकातून दिला आहे.

### जिल्हास्तरीय कराटे

यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री. पांडुरंग चांडक, मुख्यध्यापिका सारिका बजाज मॅडम,ऐश्वर्या चांडक, उपमुख्याध्यापक श्री सचिन गायकवाड, उपमुख्यापिका ज्योती बनसोडे, रमेश बाहेती सर व शाळेतील सर्व शिक्षक व शिकक्षेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व विभागीय कराटे स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### परळी न.प.साठी चौथ्या

नायब तहसीलदार पंडित सुरवसे, नगर परिषद उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित आहेत. चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक क्षेत्रातील संपूर्ण मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले.

### सतीश शेळकेंच्या रूपात

संदीप फल्हाद नवले यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा लक्षवेधी प्रवेश सोहळा पार पडला. या महत्वपूर्ण प्रवेश सोहळ्याने बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हादरला असून आगामी निवडणुकांत राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली आहेत व शिवसेनाची पकड आणखी मजबूत झाली आहे. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्यासह जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर उपस्थित होते.

### फिनिक्स शाळेत राष्ट्रीय बालदिन साजरा बालकांमध्ये आनंद आणि उत्साह



**आष्टी । प्रतिनिधी**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राष्ट्रीय बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

आष्टी येथील फिनिक्स इंटरनॅशनल स्कूल ने दि.१३ नोव्हेंबर २०२५ रोजी शाळेतर्फे वर्ग पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रीय भेट आणि रेल्वेचा अविस्मरणीय प्रवास आयोजित केला होता.

शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करून बालकांच्या प्रतिभेला वाव देण्यात आला.या निमित्ताने शाळेत नेहरूंच्या प्रतिमेचे पूजन,निबंध,चित्रकला,वक्तृत्व स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतात. विद्यार्थ्यांनी ''चाचा नेहरू'' यांचा आदर्श समोर ठेवून बालकांचे हक्क,शिक्षणाचे महत्त्व आणि स्वच्छतेचा संदेश शाळेचे प्राचार्य नागसेन कांबळे यांनी दिले. तसेच आज दि.१३ रोजी शाळेतील १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना न्यू-आष्टी ते अंमळनेर असा प्रवास घडवून आणत या प्रवासात विद्यार्थ्यांनी रेल्वे प्रवासाचा मनसोक्त आनंद घेतला. त्यांनी रेल्वे तिकीट, स्टेशनवरील तिकीट तपासणी प्रक्रिया, स्टेशन मास्टर यांची भूमिका आणि रेल्वेची कार्यप्रणाली याविषयी प्रत्यक्ष अनुभवातून माहिती मिळवली. विद्यार्थ्यांनी स्टेशन मास्टर आणि तिकीट तपासक यांच्याशी संवाद साधून रेल्वे व्यवस्थेचा जवळून अभ्यास केला.या प्रसंगी पायल रायकर, मनीषा फुंदे, सोनाली पठाडे, कोमल शेकडे, नेहता चव्हाण, गौरी कांबळे, मल्हारी गर्जे, श्याम बोराडे, सागर निकाळजे, राणी कोकरे आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत प्रवासाचा आनंद घेत उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

### धामणगाव पंचायत समिती गणातून नंदकिशोर करांडे यांच्या नावाची चर्चा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बीड सांगवी गणगेवाडी कणसेवाडी गुडेवाडी अत्यंत महत्त्वाचे बाजारपेठ ओळखले जाणारी आहे हे बीड सांगवी आ सुरेश आण्णा धस यांनी मान गावं ओळख आहे त्यामुळे बीड सांगवी येथील सरपंच पती युवा नेता नंदकिशोर करांडे यांची धामणगाव समितीचे गणातून जोरदार चर्चा सुरू आहे हे आ सुरेश आण्णा धस यांचे खंदे समर्थक आहे त्याचा सौभाग्यवती शितलताई नंदकिशोर करांडे ह्या विधामान सरपंच आहे आ सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून



नेतृत्वाखाली युवा नेता नंदकिशोर करांडे गोरं गरीबांचे सर्व सामान्य सेवा करत असताना जर अचानक रात्री अपरात्री कोणाला हॉस्पिटलची अडचणी असल्यास स्वतः नगर पुणे घेऊन जाते गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी गावातील सामाजिक शैक्षणिक तसेच सार्वजनिक प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करत सामान्य जनतेच्या विक्षस संपादन केले आहे कोणत्याही स्वार्थी शिवाय त्यांनी फक्त जनसेवा हेंच ध्येय ठेवून कार्य केलं असुन गरीब शेतकरी वर्गासाठी ते सक्रिय राहिले आहेत असे ग्रामस्थ सह तरुण मित्र मोठे जनसंपर्क आहे त्यांनी पक्ष निष्ठा शिस्त सेवा भाव यांचा आदर्श घालून दिला आहे नंदकिशोर करांडे यांना समाजाची सेवा करण्याचा व गोरं गरीब लोकांच्या मदतीला धावून जाणारे नंदकिशोर करांडे हे आहेत गेल्या वेळीस आ सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली बीड सांगवी ग्रामपंचायत एक हाती सत्ता आणली आहे सरपंच कार्यरत आहेत प्रशासनातील कामकाज अनुभव व माहितीने वेगळाच ठसा उमटवून दाखु दिले की कोणत्याही पद मोठें किंवा लहान नसते तर पदावरू बसलेल्या व्यक्ती च कार्य कौशल्याने किंवा व्यक्तींमधे असलेल्या स्किलने त्या पदा उंच ठरवते आ सुरेश आण्णा धस यांनी बीड सांगवी गावं धामणगाव पंचायत समितीचे नंदकिशोर करांडे यांना धावी अशी अपेक्षा मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### उद्योगपती सरपंच परिवंत गायकवाड महाराष्ट्र भुषण राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानीत

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील आदर्श गाव क-हेवडगावचे सरपंच, उद्योगपती परिवंत गायकवाड यांना अलिकडेच महाराष्ट्र भुषण आदर्श सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर झाला होता. सातारा जिल्ह्यातील खटाल तालुक्यातील वडूज येथे रविवार दि. ८ नोव्हेंबर रोजी ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते सरपंच परिवंत उत्तम गायकवाड यांना पुरस्कार प्रदान करुन सन्मानीत करण्यात आला.

क-हेवडगाव या छोट्या गावाला हा मोठा सन्मान मिळाला आहे. क-हेवडगाव गावचे कार्यतत्पर आणि समाजसेवेचा वसा घेतलेले सरपंच परिवंत उत्तम गायकवाड यांना महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार देण्यात आला आहे. या गौरवामुळे केवळ क-हेवडगावच नव्हे तर संपूर्ण आष्टी तालुक्याची मान उंचावली आहे. कोरोना काळात जेव्हा सर्वत्र भय आणि अनिश्चिततेचे वातावरण होते तेव्हा सरपंच परिवंत



गायकवाड यांनी सेवा हीच श्रद्धा या भावनेतून ग्रामस्थांना किराणा किट, मास्क व सॅनिटायझरचे वाटप करून मानवता जापली आहे. क-हेवडगाव येथे विविध जयंती, उत्सव, सामाजिक उपक्रम, हरिनाम सप्ताह आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेत महापंगत, अन्नदान केलेले आहे. विद्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे. अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली आहे व करीत आहेत.

सरपंच गायकवाड यांच्या कार्यातून समाजाच्या प्रत्येक घटकाला स्पर्श करणारा संवेदनशील दृष्टीकोन दिसून येतो. नेत्रदान शिबिरांचे आयोजन करून लोकांना जनजागृती केली. चष्मे वाटप केले. रुग्णांना स्वखर्चाने पुणे, अहिल्यानगर, मुंबई येथे नेत्रदानासाठी निवड झालेल्या शस्त्रक्रियासाठी दाखल होण्यासाठी बसभाड्याची व निवासाची सोय केली आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, अन्नदान, किराणा किट वाटप आणि गोरगरीबांसाठी आर्थिक मदत हे त्यांच्या सततच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. दिवाळी, पाडवा, जयंती प्रत्येक सणासुदीला ते जनतेसोबत असतात. सेवाभाव हा गायकवाडांचा संकल्प आहे. गेल्या २५ वर्षांपासून आ. सुरेश धस यांचे कट्टर समर्थक म्हणून परिवंत गायकवाड हे राजकीय कार्य करीत आहेत. सरपंच गायकवाड हे जनहिताला सदैव प्राधान्य देतात. त्यांच्या या निःस्वार्थ, विकासाभिमुख आणि मानवता, सेवाभावाचा गौरव म्हणून महाराष्ट्र भूषण हा मानाचा पुरस्कार गायकवाड यांना मिळाला आहे. या पुरस्काराबद्दल आ. सुरेश धस, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, माजी सभापती अरुणभैय्या निकाळजे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, शरद रेडेकर, माजी सरपंच रामशेठ मधुरकर, माजी नगरसेवक सादिक कुरेशी, डॉ. युवराज तुपे, सेवानिवृत पोलीस निरीक्षक मिलिद निकाळजे, दिलीप राऊत, दिपक निकाळजे, रुपेश निकाळजे, राजेंद्र बोरुडे, सोमीनाथ विधाते, राजेंद्र लाड, क-हेवडगाव ग्रामस्थ, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले. डीएसपी न्युज लाईव्ह चॅनलच्या वतीने सरपंच परिवंत गायकवाड यांना हा पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

### ॲड. बापूसाहेब जाधव यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेना जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्यनेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या सूचनेवरून आणि माध्यमातून ॲड. श्री. बापूसाहेब विठ्ठलराव जाधव यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काल, दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे नगर पालिका इच्छुक उमेदवारांच्या मुलाखत सत्र



कार्यक्रमात जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी ॲड. जाधव यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. ॲड. बापूसाहेब जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक आणि जनसंपर्क कार्यात सक्रिय असून त्यांनी समाजसेवक म्हणून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. पुढे ते शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण यांचा प्रचार-प्रसार करत, शिवसेना पक्षाच्या बळकटीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करतील, असा विश्वास जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला. उपस्थिती शिवसेना पदाधिकारी तथा शिवसैनिकांनी ॲड. बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करत शिवसेना पक्षात स्वागत केले.

# ३.४० लाख शेतकऱ्यांना फायदा; राज्य सरकारने केली मोठी घोषणा

पुणे : शेतकऱ्याचे उत्पादन वाढावे, त्याला कमी मेहनतीत जास्त फायदा मिळावा यासाठी सरकार वेगवेगळ्या योजना राबवत असते. यातीलच एक या योजनेच्या माध्यमातून शेतीशी निगडित अवजारांवर सरकार कडून अनुदान दिले जाते, जेणेकरून शेतकऱ्यांना कमी पैशात ती खरेदी करता येतील आणि तो आरामात शेतीची कामे करू शकेल. आता याच योजनेबाबत सरकारने एक महत्वाचा निर्णय घेत शेतकऱ्यांना आणखी दिलासा देण्याचं काम केलंय. कृषी यांत्रिकीकरण योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने तब्बल ३.४० लाख शेतकऱ्यांना कृषी अवजारे खरेदीसाठी पूर्वसंमती दिली आहे. तसेच, खरेदीसाठी असलेली एक महिन्याची मुदतीची अट रद्द करण्यात आली आहे,

महाडीबीटी प्रणालीअंतर्गत सध्या कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना आणि राष्ट्रीय कृषी विकास योजना (डीपीआर आधारित) या तीन प्रमुख योजना राबवल्या जात आहेत. या योजनांसाठी



शेतकऱ्यांकडून ३४ लाखांहून अधिक अर्ज आले होते. त्यापैकी ३,४०,४५० शेतकऱ्यांना 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार पूर्वसंमती देण्यात आली आहे. यापूर्वी या मंजुरीनंतर अवजारे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना एक महिन्याची मुदत होती. मात्र, पुरवठ्यातील विलंब आणि दरपत्रक बदलामुळे अनेकांना वेळेत खरेदी करणे शक्य झाले नाही. त्यामुळे कृषी विभागाने आता ही मुदतीची अट रद्द केली आहे. .या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचलित अवजारे, रोटाव्हेटर, पॉवर टिलर, कंबाईन हार्वेस्टर, मनुष्यचलित यंत्रे, फवारणी यंत्रे, तसेच नव्या अवजार बँकांसाठी देखील मंजुरी देण्यात आली आहे.

यामुळे ग्रामीण भागातील शेतीमध्ये यांत्रिकीकरण वाढेल, साहजिकच यामुळे शेती अधिक कार्यक्षम होईल आणि पिकाचे उत्पादन वाढण्यास मदत होईल. काही दिवसापासून कृषी यांत्रिकीकरणाच्या योजनांचा वेग मंदावला होता. यामागे जीएसटी दरकपातीनंतरच्या दरपत्रकांचा गोंधळ हे मुख्य कारण ठरले. वितरकांकडे सुधारित दरपत्रके नसल्याने शेतकऱ्यांनी खरेदी थांबवली होती. आता दरपत्रके आणि पुरवठा साखळी सुरळीत झाली आहे. तसेच मुदतीची अट रद्द झाली आहे त्यामुळे याचा अनेक शेतकऱ्यांना फायदा होईल.

## 'या' पद्धतीने करा नोव्हेंबर महिन्यात तूर पिकावरील किडीं आणि रोगांचे नियंत्रण



सध्या तूर पिकात फुलोरा ते शेंगा भरण्याची अवस्था सुरु आहे. या काळात पिकावर वेगवेगळ्या किडीं आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडी आणि रोगांचे वेळीच नियंत्रण केले नाही तर पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. जाणून घेऊ एकात्मिक नियंत्रण उपाय.

तूर पिकाचे कीड आणि रोग व्यवस्थापन : पीक फुलोऱ्यापासून ते शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत असताना तूर पिकाला आवश्यकतेनुसार आणि उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. रसशोषक आणि इतर किडींचा अंदाज घेऊन प्रति हेक्टरी ५ याप्रमाणे कामगंध सापळे लावावेत. शेतात पक्षांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी ''टी'' आकाराचे पक्षी थांबे प्रति हेक्टरी ५० ते ६०. उभारावेत. तूर पिकामध्ये वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. तुरीत वांझ रोगाचा प्रसार कोळी किडीमार्फत होतो म्हणून त्याच्या नियंत्रणासाठी ॲझाडीरॅक्टिन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाणी किंवा पाण्यात विरघळणारे गंधक (८० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत घाटेअळी/पसारी पतंग आणि फळमाशीच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा ॲझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५० मिलि किंवा इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ४.४ मिलि किंवा क्लोरॲन्ट्रानिलीप्रोल (१८.५ टक्के एससी) २ ते ३ मिलि प्रति १० लिटर पाणी फवारणी करावी. तूर पिकात तृणधान्याचे आंतरपीक घेतल्यास किडींचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते. एच.एन.पी.व्ही.या जैविक कीडनाशकाचा वापर करावा.

## आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे

ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु होत असल्याने उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात, त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात.

८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.



## करवंदाच्या लागवडीतून मिळतो भरपूर नफा

करवंद हे एक काळ्या रंगाचे छोटे फळ आहे. करवंदे महाराष्ट्रातील पश्चिम घाटात व कोकणात खूप प्रमाणात मिळतात. डोंगरकपारीत आपोआप उगवणारी करवंदाची काटेरी झुडपे अनेकदा पाहण्यात येतात. एप्रिल आणि मे हा हे फळ लागण्याचा काळ आहे. कच्ची करवंदे तोडल्यानंतर पांढऱ्या रंगाचा चीक येतो आणि तो हाताला चिकटतो.

ही फळे जूनच्या सुमारास पाऊस सुरू झाल्यावर गळून जातात. करवंदांची चटणी करतात आणि शिवाय त्यांच्यापासून सरबत, लोणचे, मोरंबा वगैरे करता येतो. हे मध्यम आकाराचे काटेरी झाड असते. पण चांगलाच फल्लर (झुडूपासारखे)वाढते. करवंदा झाड लवकर मोठे होत नाही. खूप हळूहळू वाढते. शेळ्या-बकऱ्या या झाडाचा पाला खात नाहीत. तसेच काटेरी झाड असल्याने कुप (कुंपण) करण्याच्या कामी येते.

**उपयोग :** करवंदाच्या फळांची भाजी, रायता (लोणचे) चटणी , मुरब्बा करतात. कच्चेपण खातात. काहीजण वरणात टाकतात. चटनीने तोंडात चव येते. करवंद हे उतार अन्न आहे. उतार म्हणजे हे खाल्ल्याने इतर ओषधांचा गुण जातो व इतर औषधी, गोळ्या, इंजेक्शन लागू पडत नाही. उतार अन्न म्हणून करवंद व जांभूळ या जुळ्या बहिणी आहेत. उतार अन्न असल्यामुळे व्रण किंवा जखम झाल्यास करवंद मुळीच खात नाही.

**अश्या प्रकारे करा करवंद लागवड:**

करवंद हे एक अत्यंत काटक व दुर्लक्षित



झुडूपवर्गीय पीक असून, मुख्यतः कुंपणासाठी मोठ्या प्रमाणावर त्याची लागवड केली जाते. झाडाच्या फांद्यांना काटे असल्यामुळे गुरे खात नाहीत. करवंदाचे झाड कोणत्याही निचऱ्याच्या जमिनीत चांगल्या प्रकारे वाढते. ते हलक्या, मुरमाड, तसेच कातळ असलेल्या जमिनीतही चांगले येते. बियांपासून रोपे तयार करून अभिवृद्धी करता येत असली तरी इच्छित प्रकारच्या जाती, प्रकाराची अभिवृद्धीसाठी गुटी किंवा जून फांद्यांच्या छाट कलमांद्वारा करणे चांगले असते.

**करवंदाच्या जाती :**

करवंदाच्या जाती फळाच्या आणि गराच्या रंगावरून ठरविल्या जातात. विद्यापीठाने ''कोकण बोल्ड' नावाची नवीन जात प्रसारित केली आहे. या जातीची फळे मोठी (१२-१६ ग्रॅम) व घोसाने लागतात, तसेच फळाची प्रत उत्कृष्ट आहे. फळे गोलाकार असून, गराचे प्रमाण ९२ टक्के आहे. फळांचा टिकाऊपणा (चार दिवस) चांगला आहे. फळे गडद काळ्या रंगाची असून, त्यात ३६१ मिली ग्रॅम ''क' जीवनसत्त्व प्रति १०० ग्रॅम गरात आहे. फळातील बिया मृदू असून, चावून खाता येतात. कच्च्या व पक्व फळांपासून विविध प्रक्रिया केलेले टिकाऊ पदार्थ तयार करता येतात.

**लागवड पद्धत :**

कुंपणासाठी लागवड करताना दोन रोपांतील अंतर ९० ते १५० सेंमी ठेवावे, सलग लागवड करताना तीन ते चार मीटर अंतरांवर कलमे लावून लागवड करावी, लागवड केल्यावर कलमांना आधार द्यावा. लागवडीसाठी एप्रिल-मे महिन्यात ४५ बाय ४५ बाय ४५ सेंमी आकाराचे खड्डे खणून माती, चांगले कुजलेले शेणखत (दोन किलो) आणि २०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट मिसळून पाऊस सुरू होण्याच्या अगोदर भरून ठेवावे. कलम लावल्यानंतर हिवाळ्यात १५ दिवसांच्या अंतराने व उन्हाळ्यात आठवड्याच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या लागवडीच्या पहिल्या वर्षी द्याव्यात म्हणजे कलमांची वाढ जोमदारपणे होईल व कलमांचे जगण्याचे प्रमाण वाढेल. प्रति कलमास सुमारे २० लिटर पाणी प्रत्येक पाळीस द्यावे. दुसऱ्या वर्षापासून कलमास पाणी देण्याची आवश्यकता नाही.

**खताची मात्रा :**

कलमाच्या चांगल्या वाढीसाठी आणि अधिक उत्पादनासाठी चौथ्या वर्षापासून प्रत्येक कलमास ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात २५ किलो शेणखत, १०० ग्रॅम युरिया आणि ५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश खत घालावे. फुले व फळधारणा लवकर होण्यासाठी खताच्या रिंगामध्ये १० ते १५ लिटर गोमूत्र जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात दोन ते तीन वेळा ओतावे. कलमांच्या सभोवती तणांची वाढ होऊ नये म्हणून १५ सेंमी जाडीचे पालापाचोळ्याचे आच्छादन द्यावे. पाचव्या वर्षापासून दर वर्षी फळे काढणीनंतर मे-जून महिन्यात फांद्यांची छाटणी करावी.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: बाल दिन (भारत)

### महत्वाच्या घटना

१६८१ : आजच्याच दिवशी ईस्ट कंपनीने बंगाल ला वेगळे प्रांत बनविण्याची घोषणा केली होती.
१७७० : जेम्स ब्रूस यांनी नाईल नदीचा स्रोत शोधला.
१९२२ : ब्रिटीश ब्रॉडकास्टिंग कंपनीने युनायटेड किंग्डम मध्ये रेडिओ सेवेची सुरूवात केली.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन वायूदलाने इंग्लंडमधील कॉव्हेंट्री शहरावर जोरदार बॉम्बहल्ला केला.
१९६९ : जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयाची स्थापना
१९७१ : मरीनर ९ या अंतराळयानाने मंगळाच्या कक्षेत प्रवेश केला.
१९७३ : आजच्याच दिवशी ब्रिटेन राजघराण्यातील राजकुमारी 'ऐन' ने इतिहासत प्रथमच एका सामान्य व्यक्तीशी विवाह केला होता, तत्पूर्वी असे कधीही घडले न्हवते.
१९७५ : स्पेनने पश्चिम सहारातून पळ काढला.
१९९१ : जर्मनीचे चॅन्सेलर डॉ. हेल्मुट कोल यांची १९९० च्या जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय सामंजस्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.
२००२ : तत्कालीन चीनचे राष्ट्रपती जियांग जेमिन यांनी आपल्या राष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला होता.
२००६ : भारत - पाकिस्तान या दोन्ही देशांतील विदेश सचिवांनी आजच्याच दिवशी दिल्ली येथे बैठकीत आतंकवाद विरोधी कार्यपध्दती विकसित करण्याचे धोरण ठरविले.
२००७ : डेन्मार्क या देशाचे पंतप्रधान आंद्रे फाग यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारला होता.
२०१३ : सचिन तेंडुलकरने आपल्या कारकिर्दीतला शेवटचा (२०० वा) कसोटी सामना खेळण्यास सुरुवात केली. वेस्ट ईंडीजविरुद्ध हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियम येथे खेळण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६५० : विल्यम (तिसरा) - इंग्लंडचा राजा (मृत्यू: ८ मार्च १७०२)
१७६५ : रॉबर्ट फुल्टन - अमेरिकन अभियंते व संशोधक, वाफेच्या शक्तीवर चालणारी जहाजे त्यांनी शोधल्यामूळे शिडाच्या जहाजांचे युग संपुष्टात आले. पाणतीराचा शोधही त्यांनीच लावला. (मृत्यू: २४ फेब्रुवारी १८१५ न्यूयॉर्क, यू. एस. ए.)
१७१९ : लिओपोल्ड मोत्झार्ट - ऑस्ट्रियन संगीतकार व व्हायोलिनवादक आणि जगप्रसिद्ध वूल्फगँग मोत्झार्टचे वडील (मृत्यू: २८ मे १७८७)
१८६३ : लिओ हेन्ड्रिक आर्थर बेकेलँड - अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ, १९०९ मधे त्यांनी लाखेवर अनेक प्रयोग करुन 'बॅकेलाईट' नावाचा पदार्थ तयार केला. ही प्लॅस्टिक युगाची सुरुवात मानली जाते. (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९४४ बेकन, डचेस, न्यूयॉर्क, यू. एस. ए.)
१८८१ : पुरावनस्पती शास्त्रज्ञ, राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष बिरबल सहानी यांचा जन्म. (मृत्यू: १० एप्रिल १९४९ पुणे)
१८८९ : पं. जवाहरलाल नेहरू - भारताचे पहिले पंतप्रधान, भारतरत्न १९५५ (मृत्यू: २७ मे १९६४).
१८९१ : बिरबल सहानी - पुरावनस्पती शास्त्रज्ञ, राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष (मृत्यू: १० एप्रिल १९४९ पुणे)
१९०४ : हेरॉल्ड लारवूड - इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: २२ जुलै १९९५)
१९०७ : हिंदी भाषेचे प्रसिध्द भारतीय साहित्यकार हरिवंशराय बच्चन यांचा जन्म.
१९१७ : प्रसिध्द हिंदी साहित्यकार गजानन मुक्तिबोध यांचा जन्म.
१९१८ : रघुवीर मूळगावकर - चित्रकार (मृत्यू: ३० मार्च १९७६)
१९१९ : अनंत काशिनाथ भालेराव - स्वातंत्र्यसैनिक, लेखक, दैनिक 'मराठवाडा' चे संपादक, हैदराबाद मुक्तीसंग्राम व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग (मृत्यू: २६ आक्टोबर १९९१)
१९२२ : ब्यूट्रोस ब्यूट्रोस घाली - संयुक्त राष्ट्रांचे ६ वे सरचिटणीस
१९२२ : अमेरिकेची अभिनेत्री वेरोनिका लेक हिचा जन्म.
१९२४ : रोहिणी भाटे - कथ्थक नर्तिका (मृत्यू: १० आक्टोबर २००८)
१९२६ : उदारवादी धोरणाचे पुरस्कर्ते व मुक्त आर्थिक व्यवहार नीतीचे खंदे समर्थक पिलू मोदी यांचा जन्म.
१९३५ : हुसेन - नवविचारांचा पुरस्कार करुन पश्चिम आशियातील शांततेसाठी अथक प्रयत्न करणारे जॉर्डनचे राजे (मृत्यू: ७ फेब्रुवारी १९९९)
१९४७ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक भारतन यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९९८)
१९७१ : ॲडॅम गिलख्रिस्ट - ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक व धडाकेबाज फलंदाज
१९७४ : हृषिकेश कानिटकर - क्रिकेटपटू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१५ : बुकर टी. वॉशिंग्टन - अमेरिकन निग्रोंच्या प्रश्नासाठी कार्य करणारे समाजसेवक, लेखक, वक्ते व शिक्षणतज्ञ (जन्म: ५ एप्रिल १८५६)
१९६७ : सी. के. नायडू - क्रिकेटपटू (जन्म: ३१ आक्टोबर १८९५)
१९७१ : नारायण हरी आपटे - कादंबरीकार, चित्रपट कथालेखक. (जन्म: ११ जुलै १८८९ समडोळी, जिल्हा सांगली).
१९७७ : अभय चरणारविंद भक्तिवेदांत तथा स्वामी प्रभूपाद - हरेकृष्ण पंथाचे संस्थापक (जन्म: १ सप्टेंबर १८९६)
१९९३ : डॉ. मणिभाई भीमभाई देसाई - स्वातंत्र्यसैनिक, महात्मा गांधींचे सच्चे अनुयायी, ग्रामीण विकासाचा पाया घालणारे सामाजिक कार्यकर्ते, दुधाचा महापूर योजनेचे एक शिल्पकार (जन्म: २७ एप्रिल १९२०)
२००० : प्रा. योगेश्वर अभ्यंकर - गीतकार व सर्जनशील कवी (जन्म: ५ नोव्हेंबर १९२९)
२०१० : भारताचे प्रसिध्द अर्थशास्त्री लक्ष्मीचंद जैन यांचे आजच्याच दिवशी निधन झाले होते.
२०१३ : प्रसिध्द बाल साहित्यकार व संपादक हरिकृष्ण देवसरे यांचा आजच्याच दिवशी मृत्यू झाला होता.
२०१५ : भारतीय दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथा लेखक के.ए. गोपालकृष्णन यांचे निधन.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत






# भोकरदन तालुक्यातील केशव जंजाळ यांचा समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश

भोकरदन । प्रतिनिधी

केशवराव पाटील जंजाळ यांच्या सह तालुक्यातील माजी जि.प.सदस्य व अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा दि.१०/११/२०२५ रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार साहेब यांच्या हस्ते पक्ष कार्यालयामध्ये जि. प. सदस्य, प. स. सदस्य आजी-माजी सरपंच,उपसरपंच सदस्य सहित सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठा प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी अल्पसंख्याक व क्रिडा मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार मंत्री मा.ना.बाबासाहेब पाटील,मा.अरुणभाई गुजराथी, माजी मंत्री धनंजय मुंडे, आमदार तथा प्रदेश सरचिटणीस मा.शिवाजीराव गर्जे साहेब, प्रवक्ते सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश सोहळा पार पडला. युवक संघटनेमध्ये भरीव असं काम करण्यासाठी भोकरदन तालुक्यातून श्री. केशवराव पाटील जंजाळ यांची फार मोठी मदत होणार आहे.सौ. मनीषाताई जंजाळ यांची ही महिला संघटन वाढन्यासाठी मोठी मदत होणार आहे.व सुभाषराव पोटे सारखे महत्वाचे पदाधिकारी सहित सर्व १८ पगड जाती धर्मांच्या कार्यकर्त्यांनी यावेळी प्रवेश केला.भविष्यात भोकरदन तालुक्यामध्ये अजित दादा गटाची ताकद वाढणार आहे असे मत या प्रवेश प्रसंगी धैर्यशील चव्हाण यांनी व्यक्त केले. प्रवेश झालेल्या सर्व मान्यवरांचे श्री. धैर्यशील चव्हाण यांनी अभिनंदन करून स्वागत केले. येणार्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादीच्या जास्त जागा निवडून आणण्यासाठी आपण प्रयत्न करू असे मत केशव पाटील जंजाळ यांनी व्यक्त



केले .यावेळी भोकरदन चे तालुका अध्यक्ष सुरेशराव सपाटे व तालुका कार्याध्यक्ष सुनीलरावजी साबळे यांची उपस्थिती होती.यावेळी अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. यांमध्ये श्रीमती सुनीता सुदाम देटे माजी प. स. सदस्य,श्री अरुण बनकर माजी प. स. सदस्य, शेख अयुब सेट, हादी चाऊस तालुका अध्यक्ष अल्पसंख्यक भोकरदन, श्री दादाराव इंच्चे, फकीरबा उबाळे कोठा ज, श्री श्रीरंग राव जामूदे माळेगाव, श्री कृष्णा गावंडे, संतोष जाधव कोळेगाव, श्री सुदामराव देठे, श्री शालिकराव बोराडे, श्री हरिभाऊ जोगदंड, ईश्वर सिंग सुरडकर, श्री रामधन सुरडकर गोद्री, श्री फकीरचंद राणा, श्री परमेश्वर सोरमारे, सचिन तेलंगरे, श्री गजानन राव इंच्चे, भागवत कानडजे, नारायण जगताप, ज्ञानेश्वर दोलत पवार, ज्ञानेश्वर भागवत पवार वालसा वडाळा, श्री भगवान राव कुदर, श्री ज्ञानेश्वर कुदर, श्री गजानन सोन्नी, श्री रमेश कुदर बोरगाव ज. श्री गजानन राव कड, शेख बशीर, चोधरी जहूर भाई,श्रीराम कड, सिपोरा बाजार, श्री सतीश रिंडे, हादी चाऊस बाभूळगाव, श्री संजय वाघ मा. सरपंच, पंडित राव गायके, संदीप वाघ तळणी, श्री दिनकर राव जाधव, दादाराव जाधव ताडकळस,सहित भायडी तळणी विरेगाव सरपंच श्रीमती रेखाताई जंजाळ व श्रीमती सुगन्दा बाई माळोदे सहित वालसा वडाळा जि. प. सर्कल मधील प्रत्येक गावचे एक प्रमुख कार्यकर्ते यांनी राष्ट्रवादी गटात मुंबई येथे श्री अजित दादा उप मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रवेश करण्यात आला.

यावेळी प्रदेश युवक सरचिटणीस श्री धैर्यशील अरविंदराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेश सोहळा पार पडला.यावेळी मोठया संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.ना.अजित दादा पवार यांनी प्रवेश केल्या बद्दल सर्वांचे अभिनंदन केले व पक्षात चांगल कामं करा पक्ष पूर्ण ताकती ने तुमच्या पाठीशी उभा राहील असे सांगितले.

## शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव द्या-बोराडे

### कापूस खरेदी केंद्राचे उद्घाटन संपन्न



मंठा । प्रतिनिधी

यावर्षीच्या अतिवृष्टीने शेतकरी मोठ्या प्रमाणावर आर्थिक अडचणीत सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव द्यावा, शेतकऱ्यांची अडवणूक होऊ नये अशा सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यांनी दिल्या. मंठा येथील महावीर जिनिंग मध्ये सीसीआय कापूस खरेदी केंद्राचे उद्घाटन सभापती श्री बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. अँड पंकज बोराडे,कल्याणराव खरात, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, अण्णासाहेब खंदारे, संतोष वरकड, दिलीप चव्हाण, बाजार समितीचे सचिव रमेश बोराडे, महावीर जिनिंगचे संचालक तथा बाजार समितीचे माजी सभापती संजय छल्लाणी, सीसीआय केंद्राचे श्री सोनवणे, तुळशीराम कोहिरे यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

सीसीआय कापूस खरेदी केंद्रात प्रथम कापूस आणणारे शेतकरी नारायण पोमा राठोड,राजेभाऊ बापुराव जगदाळे,बाळासाहेब टकले,अजित इंगळे,प्रदीप रामायणे,दत्ता जगदाळे, वैजनाथ ढवळे यांचा सत्कार सभापती श्री बोराडे व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलताना सभापती श्री बोराडे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी बाजार समिती सदैव तत्पर असते असे सांगितले. याप्रसंगी बाजार समितीचे कर्मचारी बालासाहेब कुलकर्णी, शाम हजारे, शिवसिंग छानवाल, रावसाहेब मोरे, शेख वाजीद, किरण गोरे,संजय खरात,शुभम टाकळकर,नारायण राठोड, प्रदीप गिराम,प्रताप काकडे, प्रवीण कुलकर्णी, गजानन गायकवाड दिगंबर ताठे यांची उपस्थिती होती.

## महापालिकेत होणार सवा दोनशे पदांची भरती

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महापालिकेतील रिक्त विविध १२ प्रवर्गाच्या २२४ पदांच्या बिंदूनामावलीला विभागीय आयुक्तालयाकडून मंजुरी मिळाली असून, मनपा निवडणुकीपूर्वी ही भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रशासनाचा मानस असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



महापालिकेत विविध प्रवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची सुमारे ५ हजार पदे मंजूर आहेत. मात्र १५-२० कर्मचारी दरमहिन्याला सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे मनपात कायम कर्मचाऱ्यांपेक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या वाढत असून, रिक्त पदे भरण्यासाठी मनपाने शासनाकडे परवानगी मागितली होती. यासह बिंदूनामावली तयार करून विभागीय आयुक्तांकडे मजुरीसाठी प्रस्ताव पाठवला होता. या प्रस्तावाला विभागिय आयुक्तांकडून मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे महापालिकेकडून भरती प्रक्रियासाठीची तयारी सुरू करण्यात आली आहे. यात तब्बल २२४ पदे भरण्यात येणार असून, त्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्याची तयारी मनपाकडून सुरू झाली आहे. त्यासाठी आयबीपीएस एजन्सीमार्फत भरतीसाठीचे अर्ज मागवण्यासह ऑनलाईन परीक्षा घेणे, पात्र उमेदवारांची यादी जाहीर करणे आदी प्रक्रिया पार पाडल्या जाणार आहेत. तसेच कागदपत्रांची छाननी करून नियुक्तीपत्र देण्यात येणार आहेत. यासाठी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर अर्ज मागविण्यासाठी ३ आठवड्यांची मुदत दिली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

मनपाच्या या भरती प्रक्रियेसाठी आठ ते पंधरा दिवसांत जाहिरात प्रसिद्ध होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली असून, यात उप अग्निशमन अधिकारी पदासाठी ४, अग्निशामक (फायरमन) १०० पदे, अभियंता ३२, कनिष्ठ अभियंता २४, अनुरेखक ९, रोखपाल १२, उद्यान सहाय्यक ६, स्वच्छता निरीक्षक १२ यासह विविध प्रवर्गातील पदे भरली जाणार आहेत.

## धार्मिक उपक्रमांमुळे गावात एकोपा व संस्कारात वाढ होते - भास्कर दानवे



जालना । प्रतिनिधी


लोंढेवाडी (ता. जालना) येथे (ता.१२) समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञ व ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह सोहळा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाला. या समाप्तीच्या कार्यक्रमात ह.भ.प. कृष्णाजी महाराज नवले यांनी आपल्या कीर्तनाद्वारे उपस्थित भक्तांना अध्यात्म, भक्ती व संस्कार यांचे मोल सांगितले. यावेळी भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित कीर्तन श्रवण केले व ग्रामस्थांशी संवाद साधला.

भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, "अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे गावात एकोपा, श्रद्धा आणि संस्कारांची वाढ होते. या माध्यमातून समाजात आपुलकी, सहकार्य आणि सकारात्मकतेचा संदेश पोहोचतो. धर्म, संस्कार आणि समाजसेवा ही एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. समाजाच्या बांधणीसाठी आणि नव्या पिढीपर्यंत भारतीय संस्कृतीचे मूल्य पोहोचवण्यासाठी अशा कार्यक्रमांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. या सप्ताहाचे आयोजन केल्याबद्दल मी सर्व ग्रामस्थ, आयोजक मंडळ आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. या प्रसंगी सरपंच निवृत्ती लंके, सखाराम पवार, सखाराम उंबरे, भागवत आवळे, बाबुराव जाधव, दत्तात्रय उंबरे, प्रकाश उंबरे, शिवनाथ लोंढे, बाबुराव पटरे, बबन जाधव, विष्णूबापू डोंगरे, गोवर्धन कोल्हे, सरचिटणीस सुनिल पवार, मौजपुरी सरपंच माऊली उगले, बद्रिनाथ भसांडे, निवृत्ती गायकवाड, तुषार गायकवाड, बाळूभाऊ लोहकरे, सुभाष राठोड, जीवन खुरमुटे तसेच पंचक्रोशीतील व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रशासकीय इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करा

जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट संरचनात्मक लेखा परिक्षण झाले नसल्याची बाब माहिती अधिकारात उघड झाली होती. त्यानुसार या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करा, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्त्याने केल्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी त्वरित कारवाई करत महापालिका आयुक्त आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक एकच्या कार्यकारी अभियंत्यांना स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे नुकतेच निर्देश दिले आहेत. या संदर्भात ४ नोव्हेंबर रोजी संबंधित विभागांना पत्र काढून नियमानुसार स्ट्रक्चरल ऑडिट करून अहवाल त्वरित जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असे सूचित करण्यात आले आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयाची प्रशासकीय इमारतीला पूर्णत्वास येऊन ३६ वर्ष उलटून गेले आहे. मात्र, या इमारतीचे अद्यापि स्ट्रक्बरल ऑडिट झाले नसल्याची बाब माहिती अधिकारात उघड झाली आहे. यामुळे या बाबतीत दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता भगवान दाभाडे यांनी केली होती. त्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले होते. त्यात त्यांनी १ मे १९८१ रोजी जालना जिल्हा अस्तित्वात आला. त्यानंतर २० सप्टेंबर १९८६ रोजी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान, यानंतर तब्बल ३६ वर्षांत या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाने किंवा नगरपालिकेच्या बांधकाम विभागाने एकदाही स्ट्रक्चरल ऑडिट (संरचनात्मक लेखापरीक्षण) केलेले नाही. याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागितली असता, याबाबतचा कोणताही पुरावा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आढळून आला नाही, असे उत्तर मला देण्यात आले. यावरून या विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी इमारतीचे एकदाही स्ट्रक्चरल ऑडिट केलेले नाही. हे सिद्ध झाले आहे. या इमारतीचा कोणता भाग जीर्ण झाला आहे.

इमारत धोकादायक बनली आहे काय, याबाबत शासनाला माहिती होण्यासाठी वेळोवेळी स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष करून या इमारतीमध्ये येणाऱ्या नागरिकांचा जीव धोक्यात घालण्यासारखे हे कृत्य आहे. इमारतीचे तत्काळ स्ट्रक्चरल ऑडिट करावे, संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करावी अन्यथा याबाबत लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल, याची नोंद घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

## वसमत - परभणी महामार्गावर ऑटो पलटी होऊन एकजण ठार, तीन महिला जखमी

परभणी

वसमत - परभणी महामार्गावर ऑटो पलटी होऊन अपघात झाला. यामध्ये एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला. तर तिघेजण गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी महिलेला तत्काळ नांदेड येथे हलविण्यात आले. तर इतर दोघींवर वसमत येथे उपचार सुरू आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, एक ऑटो प्रवाशांना घेऊन वसमत येथून आरळच्या दिशेने निघाला होता. ऑटो बळेगाव ते तेलगाव पाटी च्या दरम्यान गूळ कारखान्याजवळ आली असता अचानक पलटी झाली. या अपघातात ऑटोमधील प्रवासी मारुती पांडुरंग राखोडे (रा. आरळ) यांचा जागीच मृत्यू झाला. तर माधवी देविदास महाजन (वय ३६), प्रिया भिमराव पाटील (वय १३) व चंद्रकला देविदास महाजन (वय ५०) गंभीर जखमी झाले. यावेळी जवळच असलेल्या आरळी येथील नागरिकांनी जखमींना बाहेर काढून



रुग्णवाहिका बोलावून तसेच हट्टा पोलीस स्टेशनला घटनेची माहिती दिली. ठाणेदार संग्राम जाधव, पोलीस जमादार कासले, प्रीतम चव्हाण व दोन होमगार्ड तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. गंभीर जखमी असलेल्या चंद्रकला महाजन यांना रुग्णवाहिकेतून नांदेड येथे हलविण्यात आले. तर माधवी महाजन व प्रिया पाटील यांना वसमत येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. महेश मारुती राखुंडे व जखमी दोन महिला व एक मुलगी आरळ येथील रहिवासी आहेत. पुढील तपास ठाणेदार संग्राम जाधव करीत आहेत.

### जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६७८/२०२५**

**अ‍ॅड. एस. आर. कुंभार यांच्यामार्फत**

गवळण भ्र. किसन मोरे वि. निरंक ज्यापेक्षा किसन पि. पांडुरंग मोरे हे दिनांक २३.०९.२०२५ रोजी एम्स हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार

१. गवळण भ्र. किसन मोरे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. कांबी, पो. कामखेडा, ता.जि. बीड, २.अशोक पि. किसन मोरे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. कांबी, पो. कामखेडा, ता.जि. बीड, ३.सतीश पि. किसन मोरे, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. कांबी, पो. कामखेडा, ता.जि. बीड, ४. सुरेखा भ्र. बाबासाहेब घोडके, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामतीर्थ एम.आय.डी.सी. बीड, ता.जि. बीड, ५. अलका भ्र. नाना मस्के, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. पालवन, ता.जि. बीड

अर्जदार क्रं. १ ही मयत नामे किसन पि. पांडुरंग मोरे यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं. २ व ३ ही मयताची मुले आहेत. अर्जदार क्रं. ४ व ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत किसन पि. पांडुरंग मोरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २२/१२/२०२५ आहे.

आज दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित
क. लिपीक

स्वाक्षरित
आदेशावरुन
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## नगर रस्त्याची दुरावस्था; हायकोर्टाची शासनाला नोटीस

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रस्त्यावरील खड्ड्यांच्या विरोधात पार्टी इन पर्सन याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. नेवासा ते अहिल्यानगर प्रवासासाठी तीन ते चार तास वेळ लागत असल्याने वाहनधारकांसह बसने प्रवास करणारे परेशान झाले आहेत.

न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. हितेन वेणेगावकर यांनी छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना याचिकेत प्रतिवादी करण्याचे निर्देश दिले आहेत. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी काय प्रयत्न केले, यासंबंधीची विचारणा करण्यात आली. या काळात किती



अपघात झाले यासंबंधीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्य शासनाला नोटीस बजावताना देण्यात आलेत. छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रस्ता रहदारीसाठी महत्त्वाचा आहे. विदर्भ, खान्देश आणि मराठवाड्यातील वाहनधारकांसह प्रवासी बस मोठ्या संख्येने सुरू असतात. अहिल्यानगरहून पुढे पुणे येथे जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. पुणे येथे आयटी क्षेत्रात नोकरी आणि शिक्षणासाठी मराठवाडा, विदर्भआणि खान्देशमधील तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे. छत्रपती संभाजीनगर बसस्थानकाहून पुणेसाठी प्रत्येक दहा मिनिटाला बस आहे. लालपरी, एशियाड, शिव-नेरी, शिवशाही, शिवाई, इलेक्ट्रिक बस मोठ्या संख्येने आहेत. शिवाय मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यांसह खान्देश व विदर्भातून येणाऱ्या बसची संख्या अधिक आहे. दररोज दीडशेवर खासगी बस पुणेसाठी याच रस्त्यावरून जातात. मात्र नगर रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहनधारक, प्रवासी हैराण झाले आहेत. अ‍ॅड. आनंद बांगर यांनी खंडपीठात पार्टी इन पर्सन याचिका दाखल केली. खंडपीठाने किती अपघात झाले आणि रस्त्याच्या दुरुस्तीसाठी काय उपाययोजना करण्यात आल्या, अशी विचारणा राज्य शासनाकडे केली. शासनाच्या वतीने मुख्य सरकारी वकील अमरजितसिंह गिरासे यांनी बाजू मांडली. राज्य शासनाला नोटीस बजावण्यात आली आहे.

नगरला जाण्यासाठी लागतात सहा तास

अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर रस्ता खराब झाला आहे. अनेक ठिकाणी गुडघ्याएवढे खड्डे पडले आहेत. छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर हे अंतर अडीच ते तीन तासांचे असताना खड्ड्यांमुळे तब्बल सहा तासांचा अवधी लागत आहे. तर नेवासा फाटा ते नगरपर्यंतचे अंतर अवघे ४५ मिनिटांचे असून, प्रत्यक्षात प्रवासासाठी तीन तासांचा कालावधी लागत आहे.

# तांत्रिक मुद्द्याचा आधार घेत बीड नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी अनेकांची धडपड

## पक्षप्रमुखांनी मूळ मागासवर्गीय उमेदवारांनाच उमेदवारी द्यावी; शहरातील नागरिकांची भावना

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये नगराध्यक्ष पदाची जागा ही मागासवर्गीय महीला उमेदवारांसाठी राखीव आहे. या जागेवर कब्जा करण्यासाठी अनेक जण तांत्रिक मुद्द्याचा आधार घेत ही जागा पटकावण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेक पक्षाकडे उमेदवारीसाठी हे लोक खेटे घालत आहेत. साम, दाम ,दंड, भेद आदी तंत्राचा वापर करून आपल्याला उमेदवारी कशी मिळेल यासाठी प्रयत्न चालू आहेत. मात्र मूळ मागासवर्गीय उमेदवारांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी द्यावी अशी बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे. या भावनेची दखल पक्षप्रमुखांनी घेणे गरजेचे आहे.

गेल्या अनेक वर्षानंतर किंवा प्रथमच बीड शहराच्या नगराध्यक्ष पदाची जागा मागासवर्गीय महिला उमेदवारासाठी सुटलेली आहे. या जागेवर अनेक जणांचा दाव आहे. गेल्या अनेक वर्षापासून राजकारणात असलेले आणि विस-पंचवीस वर्षे नगरसेवक पद भूषविलेले उमेदवार या जागेसाठी दावा करत आहेत. काही तांत्रिक मुद्द्याचा आधार घेत जसे की ज्यांची पत्नी मागासवर्गीय आहे. मात्र ते सवर्ण आहेत. असे लोकही या उमेदवारीसाठी प्रयत्न करीत आहेत. केवळ राजकीय फायदा घेण्यासाठीच ही धडपड चालू असून जवळपास सगळ्याच पक्षप्रमुखाकडे असे लोक उमेदवारी मागत आहेत. अनेक जण साम, दाम, दंड, भेद या नीतीचा वापर



करून ही उमेदवारी पटकवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून राजकारणात असलेले आणि संविधानाला मानणारे लोक या शहरात गेल्या अनेक वर्षापासून राजकारण करत आहेत. अगदी नगरसेवक पदापासून अनेकांचे राजकारण सुरू झाले अनेक वर्ष जवळपास २० – २५ वर्षे ज्यांनी नगरसेवक पद भूषवले असे लोक या पदासाठी दावा करत आहेत. अनेक जण मूळ मागासवर्गीय असल्याने त्यांचा दावा योग्यही आहे. मात्र काही लोक स्वतः सवर्ण असताना आपल्या दलित पत्नीच्या नावावर उमेदवारी मागण्याचा प्रयत्न करत आहेत.

### जो नियम ओबीसींना तोच मागासवर्गीयांना

**गेल्या दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी मूळ ओबीसींनाच आपण तिकीट देणार असल्याचे सुचवाच केले होते. जो नियम ओबीसी साठी लागू पडतो तोच नियम मागासवर्गीयांसाठी पण लागू पडतो त्यामुळे मूळ मागासवर्गीयांना बीड नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली पाहिजे अशी भावना सर्वसामान्य लोक व्यक्त करीत आहेत.**

याचा अर्थ संविधानाची मोडतोड करून आणि बाबासाहेबांनी दिलेला मंत्र विसरून केवळ पदासाठी आणि प्रतिष्ठेसाठी हे पद आपल्याला मिळावे यासाठी अनेकांचे प्रयत्न आहेत. मात्र बीड शहरातील नागरिक सूद्न्य असल्याने आता खूप दिवसानंतर दलित समाजाला संधी मिळाली आहे. त्यामुळे मूळ दलित समाजातील उमेदवारांनाच पक्षप्रमुखांनी उमेदवारी द्यावी अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. त्यातही जो व्यक्ती सर्वांना बरोबर घेऊन जाईल, सर्व समाजात लोकप्रिय असेल असा उमेदवार जर दिला तर तो निवडून येण्याची खात्री आहे. त्यामुळे सर्वच पक्षांनी या बाबीचा विचार करावा अशी चर्चा बीड शहरात सध्या सुरू आहे.

### मूळ दलित महिलांचा तो अधिकार

बीड शहर नगराध्यक्ष पदाची जागा ही मागासवर्गीय महिलेला सुटली असल्याने मूळ जे दलित आहेत आणि तांत्रिक मुद्द्यावर जे मागणी करतात त्याशिवाय जे मूळ दलीत आहेत त्यांचा या जागेवर अधिकार आहे ही जागा त्यांनाच मिळाली पाहिजे आणि त्यातही सर्व समाजामध्ये लोकप्रिय असलेला उमेदवार जर दिला तर त्याची निवडून येण्याची खात्री आहे .

अशोक तावरे, मनसे नेते बीड

### सर्व समाजाला सोबत घेणारा उमेदवार हवा

मागासवर्गीय उमेदवार असला तरी सर्व समाजाला सोबत घेऊन त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणारा आणि कायम त्यांच्या बरोबर राहणारा उमेदवार बीड शहरामध्ये दिला तरच बीड शहरामध्ये नागरिक त्याला स्वीकारतील आणि मतदान करतील असा उमेदवार पक्षाने दिला तरच तो निवडून येईल

नितीन वाघमारे ,बीड

## जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत फ्लाईंग बड्‌र्सच्या तीन विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा नुकतीच बीड येथे पार पडली. या स्पर्धेत फ्लाईंग बड्‌र्स अकॅडमी माजलगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



या स्पर्धेत जिल्हाभरातून सर्व तालुक्यातील स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत फ्लाईंग बड्‌र्स अकॅडमी माजलगाव येथील चि.सोहम सुधाकर जाधव, चि. मधुकर मुरकुटे व ओंकार मिटकरी यांनी विविध गटातून घवघवीत यश मिळवले.हे तिन्ही विद्यार्थी विभागीय कराटे स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.या तिन्ही यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे श्री.चंद्रमुनी डोंगरे व सुखदेव माने

◀◀ पान ३ वर

# जिल्हा परिषदेत विभागप्रमुखांच्या दालनात बसविले सीसीटीव्ही कॅमेरे

## अधिकारी सुरक्षित, मात्र कर्मचारी वाऱ्यावर



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या इमारतीमध्ये सुरक्षा आणि कामकाज सुरळीत व्हावे, यासाठी सिसी टीव्हि, बसविण्याची अनेक दिवसाची मागणी काही अंशी का होईना, पूर्ण करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या ८ विभागप्रमुखांच्या दालनात कॅमेरे बसविण्यात आले आहे. यामुळे मात्र अधिकारी सुरक्षित आणि कर्मचारी वाऱ्यावर, अशी परस्थिती निर्माण झाली आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या इमारतीमध्ये सन २०२२ मध्ये नूतन इमारतीमध्ये कार्यालय स्थलांतरित झाले आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांनी अर्धवट बांधकाम आणि अनेक सुविधांचा अभाव असताना कन्या शाळेतील कार्यालय हलविले. मात्र याठिकाणी स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची मुबलक सोय अद्यापही नाही. कर्मचारी व विभाग प्रमुखांच्या दालनात येऊन अरेरावी करणाऱ्यांना चाप बसावा, यासाठी कॅमेरे बसविण्याची मागणी करण्यात येत होती. गेल्या आठवड्यात फक्त ८ कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यामुळे अधिकारी शेप, मात्र कर्मचारी वाऱ्यावरच, असे म्हणण्याची वेळ आली आहे.जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या दालनात

◀◀ पान ३ वर

## धारूर नगरपरिषदसाठी अर्ज भरणीस तिन दिवस उरले तरी नगरसेवक पदासाठी एकच अर्ज

किल्लेधारूर । प्रतिनिधी

नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास तीनच दिवस उरलेली असताना फक्त एकच अर्ज नगरसेवक पदासाठी आला असून अद्याप नगराध्यक्ष पदासाठी एकही अर्ज दाखल झालेला नाही यामुळे पुढील तीन दिवसात अर्ज भरण्यासाठी गर्दी होणार असे चित्र दिसून येत आहे


धारूर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया नगरपरिषद कार्यालयात होत आहे दिनांक १३.११.२०२५ रोजी नगरपरिषद किल्ले धारूर येथे नगरसेवक पदासाठी प्रभा सात मध्ये एक (०१) नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. व नगराध्यक्ष पदासाठी शून्य नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. अर्ज भरणीस तीनच दिवस राहिल्याने आता पुढील तीन दिवस अर्ज भरण्यासाठी गर्दी होणार असे चित्र दिसून येत आहे

# सतीश शेळकेंच्या रूपात राजूरीमधून फडकणार भगवा

## अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत अनेकांचा शिवसेनेत प्रवेश!

बीड । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या उंबरठ्यावर बीडच्या राजकारणात जबरदस्त उलथापालथ झाली असून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल कार्य प्रणालीला प्रभावित होऊन



शिवसेना जिल्हाप्रमुख सन्माननीय अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील शेकडो महत्वपूर्ण पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला आहे. काल, दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ९. ०० वाजताच्या दरम्यान मुंबईतील मुक्तागिरी निवासस्थानी महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक अत्यंत विश्वासू व खंदे समर्थक म्हणून सर्वश्रुत असणारे सतीष जगन्नाथ शेळके, कैलास रमेश घल्लाळ (सरपंच), अजिज चाँद शेख (उपसरपंच), प्रफुल्ल हनुमंतराव पाठक,किरण शिवाजीराव शिंदे, रोहित श्रीराम जाधव, सुरेश शिवाजीराव खुरणे (उपसरपंच),गणेश आनंदराव भरनाळे,महेश भगवान कदम,

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ताकद पाठीशी

## किल्लेधारूरात शिवसेनेचा भगवा नक्कीच फडकणार –अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कुशल कार्य प्रणालीला प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख सन्माननीय अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत, शिवसेना तालुका प्रमुख किल्लेधारूर नारायण कुरुंद यांच्या



माध्यमातून किल्लेधारूर नगर परिषद नगराध्यक्ष पदाचे प्रबळ दावेदार सुरेश आण्णा गवळी यांच्या समवेत किल्लेधारूर येथील नगरसेवक पदाचे प्रबळ दावेदार शौकेत शेरशहा इनामदार, दिलीप नवनाथ सिरसाट, बबलू सुधाकर सावंत, अशोक संभाजी शिंगारे, गीतांजली रघुनाथ पांचाळ, शेख नदीम, कृष्णा माणिक लोखंडे, लक्ष्मीबाई रमेश पारवे, तुषार औताडे, कृष्णा गायके, अरुणा सुरेश जोगदंड, इरफान शेख, मुनाफ शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

काल दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी दु. २.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना

◀◀ पान ३ वर

## बीड नगराध्यक्षपदासाठी खऱ्या मागासवर्गीय महिलेऐवजी मुस्लिम उमेदवारालाच संधी?

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या निर्णयावरून मागासवर्गीय समाजात संताप

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी नगराध्यक्ष पद राखीव ठरले आहे. मात्र, या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून केवळ कागदपत्रांवर अनुसूचित जातीची ओळख



असलेल्या महिलेला उमेदवारी देऊन प्रत्यक्षात मुस्लिम समाजातील व्यक्तीमार्फत राजकारण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निर्णयामुळे मागासवर्गीय समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

प्रेम कांबळे, अजय धनवे यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड नगरपरिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत. नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव असल्याने,

◀◀ पान ३ वर

# परळी न.प.साठी चौथ्या दिवशीपर्यंत नगराध्यपदासाठी १ तर नगरपरिषद सदस्य पदासाठी १० अर्ज दाखल

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

नगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. १७ प्रभागांमधील ३५ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरू झाली असून सोमवारी (दि. १७) दुपार ३ पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. दि. १३ नोव्हेंबर पर्यंत नगरपरिषद सदस्य पदाकरिता १० अर्ज आणि नगराध्यक्ष पदाकरिता १ असे एकूण ११ नामनिर्देशनपत्र परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणूक विभागात दाखल करण्यात आले आहेत. अर्ज दाखल करण्यासाठी शनिवारी उमेदवारी अर्ज भरता येणार आहे. तर रविवारी सुट्टी आहे अशी माहिती निवणूक विभागाकडून देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूक- २०२५ साठीचा कार्यक्रम ४ नोव्हेंबर रोजी घोषित केला आहे. त्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. त्यामुळे नगरपरीषद कार्यक्षेत्रात आचार संहिता लागू आहे. येथील नगराध्यक्ष त्याचबरोबर १७ प्रभागांतील ३५ नगरसेवक पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाली असून, नगरपालिकेच्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांच्या कक्षात अर्ज स्वीकारले जात आहे. १७ प्रभागांसाठी प्रत्येकी दोन अशा एकूण ३४ कर्मचारी तसेच नगराध्यक्ष पदासाठी दोन कर्मचारी व त्यांना साहाय्य करण्यासाठी १८ तलाठी नियुक्त आहेत. नामनिर्देशन पत्रासोबत अनामत रक्कम स्वीकारण्यासाठी स्वतंत्र दोन कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती केली आहे.नगर परिषद क्षेत्रातील ७९,५६९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, त्यात ४१,०२३ पुरुष, ३८,५४३ महिला आणि ३ इतर मतदार आहेत. मतदानासाठी ८८ केंद्रे निश्चित केली आहेत. अर्ज दाखल दि. १० नोव्हेंबर पासून सुरुवात व अंतिम तारीख १७ नोव्हेंबर, छाननी १८ नोव्हेंबर, अर्ज मागे घेण्याची मुदत १९ ते २१ नोव्हेंबर, चिन्ह वाटप २६ नोव्हेंबर, मतदान २ डिसेंबर, आणि मतमोजणी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता होईल. नगर परिषद निवडणुकीसाठी सोमवारपासून ऑनलाईन अर्ज भरणे सुरू झाले असून, त्या भरलेल्या अर्जाची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे द्यायची आहे. येथील नगर परिषदेच्या इमारतीमध्ये निवडणूक कक्ष तयार करण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी त्र्यंबक कांबळे,सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार परवीन पठाण,

◀◀ पान ३ वर

# वैजाळा पाचेगाव परिसरात बिबट्याची दहशत!

## शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण; वनविभागाकडून रात्री शेतात न जाण्याचे आवाहन

**पाटोदा | प्रतिनिधी**

**आष्टी परिसरात मागील महिन्यात वाघाच्या हल्ल्यात एका तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर आता पाटोदा तालुक्यात बिबट्याची दहशत निर्माण झाली आहे. दोन दिवसांपूर्वी गारमाथा परिसरात बिबट्याचे दर्शन झाल्यानंतर आता वैजाळा आणि पाचेगाव परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. अनेक शेतकऱ्यांनी या बिबट्याला पाहिल्याचे सांगितल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.**



आहे.या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांना वैजळा येथील शेतकऱ्यांनी या संदर्भात माहिती दिल्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वनविभागाशी तातडीने संपर्क साधला. त्यांनी वनअधिकारी गरकळ यांच्याशी चर्चा करून त्वरीत सर्च ऑपरेशन सुरू करण्याच्या सूचना दिल्या. धस यांच्या सूचनेनंतर अवघ्या एका तासात बुधवारी दुपारपासून वनविभागाचे अधिकारी आणि पथक घटनास्थळी दाखल झाले असून संपूर्ण परिसरात सर्च ऑपरेशन सुरू आहे वनपरिक्षेत्र अधिकारी एस एस काळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक बी जी सानप वनसेवक शहादेव पवार पोपटी गुजर ड्रायव्हर रोहित पुरी यांचे पथक राबवत असून शेतकऱ्यांमध्ये देखील जनजागृती केली जात आहे दरम्यान शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात जाण्याचे टाळावे असे आवाहन आमदार सुरेश धस यांच्यावतीने करण्यात आले.

# नवीन कायद्याची माहिती असावी: सपोनि मनोज निलंगेकर

## नवीन कायदेच्या कार्यशाळा तलवाडा पोलीस स्टेशनच्या वतीने संपन्न

**तलवाडा प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील तलवाडा येथील पोलिस डि जे आफिस मुंबई आदेशाने पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत.अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर.उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके. यांच्या मार्गदर्शनाखाली तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर यांनी जि. प, शाळेत आज दिं.१३ रोजी नवीन कायदेविषयक



विद्यार्थीची कार्यशाळा मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी प्रमुख उपस्थिती सपोनि मनोज निलंगेकर, उपनिरीक्षक स्वापनिल कोळी, पत्रकार आल्ताफ कुरेशी, प्रयेवेक्षक खेडकर ,बीट अंमलदार पोह अंजन गडदे, गोपनीय शाखेचे विठ्ठल राठोड,चालक सुग्रीव रुपनर, शोरफ पठाण. उपस्थित होते या नवीन कायदेविषयक मार्गदर्शन करताना सपोनि मनोज निलंगेकर यांनी सांगितले की अनेक गुन्ह्यांमध्ये कसे बदल झाल कलमांची माहिती दिली अनेक गुन्ह्यांमधील स्पष्ट कलमेनुसार सर्व व माहिती दिली मोबाईल संदर्भात सविस्तर माहिती दिली सपोनि मनोज निलंगेकर यांनी विद्यार्थ्यांना ची प्रश्न उत्तर स्पर्धा घेऊन त्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. प्रस्तावित विष्णू खेत्रे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन पी बी जाधव यांनी आभार मानले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ । पान ७

# राधाकृष्ण विखे पाटलांच्या आशीर्वादामुळे पुणे विद्यार्थी गृहात गैरकारभार!
# शिक्षक-कर्मचारी संघाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे उपोषण सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

राधाकृष्ण विखे पाटलांच्या पाठिंब्याने पुणे विद्यार्थी गृहामध्ये मोठ्या प्रमाणात गैरकारभार सुरू आहे. पुणे विद्यार्थी गृहाचा मोठा भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. विखे पाटलांच्या खोट्या सह्या! महिलेचा विनयभंग! आणि कामावरून काढण्याची धमकी दिली जात असल्याचे आरोप प्राध्यापक शिक्षक व कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे यांनी केला आहे.

शिदे म्हणाले की, सदाशिव पेठ येथील पुणे विद्यार्थिगृहामध्ये मोठा गैरव्हायहार चालू असून, तो गैरकारभार थांबण्यासाठी आणि आरोपींना कठोर शिक्षा व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य प्राध्यापक शिक्षक व कर्मचारी संघाच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालसमोर धरणे आंदोलन उपोषण सुरू आहे. अंबादास शिंदे, सचिन कुदळे, विमला दरे यांनी उपोषण सुरू केले आहे. पुणे विद्यार्थी गृहामध्ये असलेले विद्यमान संचालक मंडळ हे बेकायदेशीर आहे. अनेक पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपलेला असतानादेखील ते संचालक मंडळावर कार्यरत आहेत. असे बेकायदेशीर संचालन मंडळ हे नियमांच्या विसंगत स्वतःच ठराव करून स्वतःचे पगार हे लाखो रुपयांनी वाढवले आहेत. त्यांनी स्वतःच्या व नातेवाईकांच्या नावे भरपूर प्रॉपर्टी घेतलेली आहे. ज्यामध्ये स्थावर आणि जंगम मालमत्तेचा समावेश आहे. संबंधित गैर मार्गाने बसलेले संचालक मंडळ या सगळ्यांची लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागामार्फत चौकशी करावी. तसेच संस्थेच्या दस्तांवर अध्यक्षांच्या खोट्या सह्या करून अफरातफर केल्याबद्दल कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी आणलेल्या साहित्य तसेच धान्य भाजीपाला जास्तीच्या नोंदी करून पैशांची लूट करीत आहेत. कित्येक वर्षांपासून संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांच्या खोट्या सह्या करून



विद्यमान संचालक मंडळ मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करीत आहे. शैक्षणिक पात्रता नसतांना जवळच्या लोकांचे नोकर भरती करून घेतली. प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांवर अत्याचार करीत आहेत. सबंधित संचालकांनी महिला कर्मचाऱ्याचा विनयभंग केल्याची माहिती स्वतः पीडित महिलेने सांगितली. संस्थेचा चेंज रिपोर्ट धर्मादाय आयुक्तांनी फेटाळला असतांना देखील गैर मार्गाने बसलेलेले संचालक मंडळ हे संस्थेच्या विविध कामात ढवळाढवळ करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करीत आहेत. धर्मादाय आयुक्तांनी दोषी संचालकांवर गुन्हे दाखल करून कारवाईचे आदेश दिले असताना देखील पोलिस प्रशासन त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत.

आंदोलनकर्ते सचिन कुदळे म्हणाले की, राधाकृष्ण विखेपाटलांसारख्या बलाढ्य मंत्र्यांचा पाठिंबा असल्यामुळेच अनधिकृत असलेले संचालक मंडळ भ्रष्ट मार्गाने कामकाज करीत असून, त्यांना शासन आणि प्रशासनाची भिती राहिली नाही. आंदोलनकर्त्यांनी सांगितल्याप्रमाणे राजेंद्र बोराडे (तथाकथित चेअरमन), संजय गुंजाळ (तथाकथित सेक्रेटरी), रिटायर्ड झालेले सुभाष दिर्घे (तथाकथित उपाध्यक्ष), अमोल जोशी (उपाध्यक्ष), श्री मिसळ (सचिव), श्री अनंत कुलकर्णी, श्री रमेश कुलकर्णी यांचे चेंज रिपोर्ट रिजेक्ट झालेले असताना देखील हेही संचालक म्हणून काम पाहत आहेत, श्री कृष्णजी कुलकर्णी यांच्यावर पोस्को अंतर्गत गुन्हा असूनही किंवा लैंगिक छळ केल्याची तक्रार असूनही ते आज रोजी संचालक पदावर कार्यरत आहेत. राजेंद्र संपत कांबळे एसएनडीटीमध्ये पूर्ण वेळ शासकीय कर्मचारी असूनदेखील इकडे बेकायदेशीर पदावर आले आहेत.संस्थेतून देखील पगार पगार घेतात, एकच वेळी दोन पदांची पगार घेतात. सन २०१६ रोजी पुणे धर्मादाय यांचा अहवाल तसा अहवाल असल्याचे सांगून हे सर्व नामोल्लेख केलेले संचालक मंडळ बेकायदेशीर आणि दोषी आहेत असा दावा यांनी केला आहे, त्यांनी केला आहे.

दरम्यान, अनागोंदी गैरकारभार चालू असतां देखील यांच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई होत नाही. दोषी संचालकांवर गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा झाली पाहिजे यासाठी आंदोलन करीत आहोत. राधाकृष्ण विखे पाटील हेच या अनधिकृत संचालकांना पाठबळ देत असल्याचा दावा करून सदर संपूर्ण माहिती आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन उपोषण करीत असलेल्याला आंदोलनकर्त्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी सांगितली.

## पुणे विद्यार्थी गृहात मोठा गैरकारभार उघड!



**राधाकृष्ण विखे पाटलांचा पाठिंबा; दोषी संचालकांचे उपोषण आंदोलन सुरू. संचालक मंडळ बेकायदेशीर, पगार वाढीपासून प्रॉपर्टी खरेदीपर्यंत अफरातफर. विद्यार्थ्यांसाठी आलेले धान्य व साहित्य जास्त नोंदी करून पैशांची लूट!**

**महिलेला विनयभंग आणि कामावरून काढण्याची धमकी; पीडित महिला उपोषणात सहभागी. धर्मादाय आयुक्तांच्या कारवाई आदेशांचा निषेध; पोलीस प्रशासन निष्क्रीय. प्रमुख आरोपी: राजेंद्र बोराडे, संजय गुंजाळ, सुभाष दिर्घे, अमोल जोशी, श्री मिसळ, कृष्णजी कुलकर्णी व अन्य. आंदोलनकर्त्यांचा संदेश: दोषी संचालकांवर त्वरित कारवाई होईपर्यंत लढा चालू राहणार.**

## निवडणुकांपूर्वी पोलिसांकडून प्रतिबंधात्मक कारवायांना सुरुवात; तीन गुन्हेगारांवर एमपीडीएची कारवाई

**पिंपरी । प्रतिनिधी**

एमआयडीसी भोसरी, चाकण आणि काळेवाडी परिसरातील तीन कुख्यात गुन्हेगारांवर एमपीडीएची कारवाई करण्यात आली. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवायांना सुरुवात केली आहे.



एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वास्तव्याला असलेला प्रीतम उर्फ शुभम राहुल राठोड (वय २३, रा. कुदळेवस्ती, मोशी) हा पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर जबरी चोरी, अवैधरित्या दारू विक्री करण्याचे एकूण आठ गुन्हे दाखल आहेत. सध्या तो नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात आहेत.

चाकण परिसरातील अट्टल गुन्हेगार महेश बबन कड (वय ३२, रा. कडाचीवाडी, चाकण) याच्या विरोधात खून, खंडणी मागणे, मारामारी असे पाच गंभीर गुन्हे दाखल आहेत. सध्या तो ...पूर मध्यवर्ती कारागृहात आहे. तर काळेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अट्टल गुन्हेगार सौरभ विकास साठे (वय २२, रा. रहाटणी) याच्यावर देखील खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, खंडणी मागणे, तडीपारीच्या आदेशाचा भंग करणे, पिस्तूल आणि इतर हत्यारे जवळ बाळगणे असे आठ गंभीर गुन्हे दाखल आहेत. सध्या तो अमरावती मध्यवर्ती कारागृहात आहे. स्थानिक पोलिसांनी तीनही आरोपींच्या विरोधात स्थानबद्धतेचा प्रस्ताव पोलीस आयुक्तांकडे पाठवला होता. त्यानुसार पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी तीनही आरोपींना एक वर्षासाठी कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. यंदाच्या वर्षात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी २५ गुन्हेगारांवर स्थानबद्धतेची कारवाई केली आहे.

## निवडणुकांसाठी राष्ट्रवादीचे निरीक्षकांची नियुक्ती

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

तालुक्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे तळेगाव दाभाडे, लोणावळा नगरपरिषद व वडगाव नगरपंचायत या निवडणुकांसाठी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी दिली.




तळेगाव दाभाडे नगरपरिषद निवडणुकीसाठी माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, लोणावळा नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी माजी सभापती विठ्ठल शिंदे आणि वडगाव नगरपंचायत निवडणुकीसाठी गणेश ढोरे यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तळेगाव दाभाडे नगरपरिषदेतील २८ जागांसाठी निवडणूक होणार असून, नगराध्यक्षपद सर्वसाधारण जागेसाठी खुले आहे. लोणावळा नगरपरिषदेतील २७ जागांसाठी निवडणूक होत असून, नगराध्यक्षपद अनुसूचित जाती आरक्षित आहे. तर वडगाव नगरपंचायतीत १७ जागांसाठी निवडणूक होणार असून नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित आहे. तब्बल सात वर्षांनंतर या तीनही स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका होत असल्याने, या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीचा झेंडा फडकवण्याचा निर्धार पक्षाने केला आहे.

## अमेडियाला शुल्क भरण्यास १५ दिवस मुदत मुंढवामधील जमिनीची वादग्रस्त खरेदी

**पुणे । प्रतिनिधी**

मुंढवा येथील ४० एकर जमीन खरेदी प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या अमेडिया एंटरप्राइझेसने खरेदीखत रद्द करण्याचा निर्णय घेतला असला, तरी मंगळवारपर्यंत त्यादृष्टीने कोणतीही कार्यवाही केली नाही. दरम्यान, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने कंपनीला बुडवलेले मुद्रांक शुल्क भरण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली आहे. त्यामुळे या मुदतीत कंपनीला निर्णय घ्यावा लागणार आहे.

मुंढवाजमिनीच्या प्रकरणात तहसीलदार सूर्यकांत येवले यांच्यासह अमेडिया आणि कुलमुख्यारधारक शीतल तेजवानी यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी मुद्रांक शुल्काची नियमबाह्य पद्धतीने सवलत घेण्यात आली आहे.या प्रकरणाला वाचा फुटल्यानंतर कंपनीने हा व्यवहार रद्द करण्याच्या हलचाली सुरू केल्या. गेल्या शुक्रवारी कंपनीने दुय्यम निबंधक कार्यालयास भेट देऊन खरेदीखत रद्द करण्याबाबत चौकशी केली होती. त्यावर नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने कंपनीला नोटीस बजावून



खरेदीखतापोटी सात टक्के म्हणजे २१ कोटी रुपये, तर कॅन्सल डिड करण्यासाठी सात टक्के म्हणजे २१ कोटी रुपये असे एकूण ४२ कोटी रुपये भरावे भरावेत, असे कळविले. त्याला पाच दिवस झाले तरी कंपनीने खरेदीखत रद्द करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आता कंपनीला १५ दिवसांत निर्णय घ्यावा लागणार आहे. या मुदतीत नोंदणी विभागासमोर बाजू मांडावी लागणार आहे. ती मांडल्यानंतर कायदेशीर बाबींचा विचार करून त्यावर नोंदणी विभाग निर्णय घेईल. त्यानंतर दस्तनोंदणी रद्द होऊ शकते. कंपनीने मुदतीत बाजू मांडली नाही, तर विभागाकडून कंपनीविरोधात जप्तीची कारवाई होऊ शकते.

## १३० वर्षांपूर्वीचे दुर्मीळ हस्तलिखित सापडले

### सदाशिव लिखित २५२ पृष्ठांचे ज्ञानलीलामृत; ओवीबद्ध रचना

**पुणे । प्रतिनिधी**

'अलंकापुरी महात्म्य' कथन करणारे सदाशिव लिखित १३० वर्षांपूर्वीच्या 'ज्ञानलीलामृत' या ओवीबद्ध हस्तलिखिताची दुर्मीळ प्रत नुकतीच सापडली आहे. या ग्रंथात एकूण १८ अध्याय असून, हस्तलिखित २५२ पृष्ठांचे आहे. या दुर्मीळ ग्रंथाचे अद्याप प्रकाशन झाले नसल्याने भाविक यापासून अनभिज्ञ आहेत.

ज्ञानलीलामृत हे दुर्मीळ मराठी हस्तलिखित मराठी हस्तलिखित केंद्राकडे नुकतेच आले आहे. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे माजी ग्रंथपाल आणि दुर्मीळ हस्तलिखितांचे अभ्यासक-संग्राहक वा. ल. मंजूळ यांनी या हस्तलिखिताचे महत्त्व सांगितले. आळंदी येथे सोमवारी (१७ नोव्हें.) श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी उत्सव साजरा होत असताना या दुर्मीळ हस्तलिखिताचा परिचय मंजूळ यांनी करून दिला.

ज्ञानलीलामृत या हस्तलिखिताचे मूळ स्कंद



पुराणाच्या सह्याद्री खंडातील ६४ व्या अध्यायामध्ये ब्रह्मदेव आणि नारद यांच्या संवादातून मांडले गेले आहे. यामध्ये श्रीक्षेत्र आळंदीचा पूर्वेतिहास, ज्ञानदेवांसह भावंडांची चरित्रे संस्कृतमधून मांडली गेली आहेत. या ग्रंथाचे शके १८१७ म्हणजेच १८९५ मध्ये ज्ञानलीलामृत नावाने मराठीकरण करण्यात आले. त्याचा लेखक 'सदाशिव' असा उल्लेख ग्रंथात करण्यात आला आहे.सदाशिव हा मूळचा संत ज्ञानदेवकालीन अंतोबा कुलकर्णी यांच्या वंशातील आहे. ज्ञानदेव समाधीत प्रवेश करताना अंतोबांनी त्यांचा हात आपल्या मस्तकी ठेवून त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. नंतरच्या काळात आळंदी क्षेत्री अंतोबांचे वंशज नांदत असल्याची नोंद आजही वंशपरंपरागत प्रत्यक्ष स्वरूपात पाहावयाला मिळते, असे मंजूळ यांनी सांगितले.ज्ञानलीलामृत या ओवीबद्ध हस्तलिखिताच्या दुर्मीळ प्रतीच्या आधारे अलंकापुरी महात्म्यावर नवा प्रकाश पडणार आहे. श्री क्षेत्र आळंदी हे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे कार्यक्षेत्र असल्याने माउली भक्तांसाठी हस्तलिखिताविषयी औत्सुक्य निर्माण होणार आहे. प्रकाशन झाले नसल्याने हा दुर्मीळ ग्रंथ अभ्यासक, संशोधक आणि वारकरी संप्रदायासाठी अजूनही अपरिचित असाच आहे. श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी उत्सव सोमवारी (१७ नोव्हें.) आळंदी येथे साजरा होत असताना या दुर्मीळ ओवीबद्ध हस्तलिखित प्रतीचा शोध लागल्याने सर्वांसाठी आनंदाची पर्वणी ठरेल. या प्रतीवरील हस्तलिखिताचा नमुना छपाई मुद्रणासारखा असल्याने हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरला आहे.

## नवले पुलावर भीषण अपघात; ८ जण ठार तर, २२ गंभीर जखमी



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-बंगळुरू महामार्गावर नवले पुल परिसरात गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा परिसर हादरला. दोन कंटेनर आणि एका कारचा झालेला जबरदस्त अपघात काही क्षणांतच आठ जण जिवंत जळून खाक झाले तर तब्बल २० ते २२ जण जखमी झाले. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कात्रज बोगद्याकडून दरीपुलाकडे येणारा एक कंटेनर उतारावर भरधाव वेगात जात असताना अचानक त्याचे ब्रेक फेल झाले. नियंत्रण सुटल्याने या कंटेनरने समोर असलेल्या आठ ते दहा वाहनांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर कंटेनरच्या डिझेल टँकला आग लागली आणि काही क्षणांतच आगीचे लोट आकाशात झेपावले.

या दरम्यान, सेल्फी पॉइंटजवळ एका टुरिस्ट कारला कंटेनरने ठोकर दिली. कार पुढे उभ्या दुसऱ्या कंटेनरमध्ये अडकली आणि क्षणात जळून खाक झाली. या कारमधील दोन महिला आणि एका मुलीचा घटनास्थळीच होरपळून मृत्यू झाला. कंटेनर चालक आणि त्याचा क्लिनर यांचा देखील आगीत होरपळून मृत्यू झाला. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल होताच त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र तोपर्यंत वाहनांचे केवळ सांगाडेच उरले होते. रात्री आठ वाजेपर्यंत अग्निशमन दलाने तब्बल आठ मृतदेह बाहेर काढले. तर २२ जखमींना विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर आहे.

घटनेनंतर महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन पोलिसांनी लगेचच वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळवली. घटनास्थळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्वतः भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या परिसरात याआधीही अनेक अपघात घडले असून स्थानिक नागरिकांचा संताप पुन्हा उफाळून आला आहे. नवले पुलावर कायमस्वरूपी सुरक्षा उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी संतप्त नागरिकांनी केली आहे.

## काळेपडळ पोलिसांचा कडक इशारा! सराईत गुन्हेगारांची धिंड, मालमत्तेवर बुलडोझर

**पुणे । प्रतिनिधी**

कोयते नाचवत दहशत माजविणारे, गाड्यांची तोडफोड, गाड्या पेटवून देणे, बेभान दुचाकी चालविणार्या गुन्हेगारांच्या काळेपडळ पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून कुख्यात गुंडांच्या मालमत्तेवर बुलडोझर चालवला आहे. नवख्या गुन्हेगारांवर वेळीच जरब बसवली आहे.

काळेपडळ पोलिस ठाणे हे काही महिन्यांपूर्वी सुरू झाले असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना या पोलिस ठाण्याकडून वरिष्ठ पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील हे राबवत आहेत. मंगळवारी सायंकाळी श्रीराम चौकात



गुन्हेगारांची धिंड काढली व सर्वसामान्य नागरिकांसोबत आम्ही आहोत, हे पोलिसांनी जनतेला दाखवून दिले.काळेपडळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत वरिष्ठांच्या आदेशानुसार विधिसंघर्षित बालकांना पोलिस स्टेशनमध्ये समक्ष बोलावून योग्य सूचना देण्यात आल्या. त्यांच्या सविस्तर माहितीचे अर्ज (डोझियर) भरण्यात आले.तसेच, त्यांचे नातेवाईक, पालकांना देखील सदरबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विधिसंघर्षित बालकांकडून झालेले गुन्हे पुन्हा घडणार नाहीत, याबाबत पालकांनी ग्वाही दिली. विधिसंघर्षित बालकांवर योग्य ती प्रतिबंधक कार्यवाही करण्याची तजवीज सुरू आहे.तसेच, सदर विधिसंघर्षित बालकांना समुपदेशनद्वारे मन परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला आहे. विधिसंघर्षित बालकांचे नातेवाईक व पालक यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आल्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी सांगितले.

## पुण्यात आणखी एका सरकारी जमिनीचा घोटाळा! ताथवडे येथील १५ एकर जमीन परस्पर विक्री; सहाय्यक दुय्यम निबंधक निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

मुंढवा आणि बोपोडीतील सरकारी जमीन गैरव्यवहारानंतर आता पिंपरी-चिंचवडजवळील ताथवडे (ढरींहुरवश) येथे राज्य सरकारच्या पशुसंवर्धन खात्याच्या मालकीची तब्बल १५ एकर जमीन परस्पर विकल्याचा तिसरा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. कोट्यवधी रुपयांचा हा बेकायदा व्यवहार जानेवारी २०२५ मध्ये झाला असून, शासनाला कोणतीही माहिती न देता हा व्यवहार करण्यात आला आहे. या प्रकरणी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने कठोर भूमिका घेत हवेलीच्या सहाय्यक दुय्यम निबंधक विद्या शंकर बडे (सांगळे) यांना निलंबित केले आहे.

पिंपरी-चिंचवड भागातील ताथवडे येथील पशुसंवर्धन खात्याच्या मालकीची सुमारे १५ एकर (६ हेक्टर ३२ आर) जमीन खात्याला पूर्णपणे अंधारात ठेवून परस्पर विकण्यात आली आहे. पशुसंवर्धन खात्याच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारामध्ये 'आयुक्त पशुसंवर्धन यांचा ताबा असून शासनाच्या परवानगीशिवाय विक्रीस बंदी' असा स्पष्ट शेरा असतानाही हा व्यवहार करण्यात आला. हेरंब गुपचूप



नामक व्यक्तीने ९ जानेवारी २०२५ रोजी (दस्त क्रमांक ६८५/२०२५) ही जमीन पशुसंवर्धन विभागाला अंधारात ठेवून परस्पर विक्री केली. विक्री व्यवहाराचा दस्त झाल्याची माहिती मिळाल्यानंतर पशुसंवर्धन खात्याकडून पुणे विभागीय आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली, त्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

ताथवडे येथील सर्वे नंबर २० मधील या जागेसंदर्भात उच्च न्यायालयात दावा दाखल असला तरी, कोर्टाने मालकीसंदर्भात कोणतेही भाष्य केलेले नव्हते. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर इतर अधिकारामध्ये पशुसंवर्धन खात्याचे नाव कायम होते. खात्याच्या परवानगीशिवाय जमिनीचा व्यवहार करता येत नसतानाही, संबंधित दुय्यम निबंधकांनी नोंदणी करताना गंभीर अनियमितता केल्याचे समोर आले आहे. दस्त नोंदवताना अद्ययावत ७/१२ उतारा जोडलेला नव्हता; तर दस्तासोबत जोडलेल्या जुन्या उताऱ्यावर शासनाचा ताबा किंवा विक्रीवरील बंदीचा उल्लेख नव्हता. महत्त्वाचे म्हणजे, फेब्रुवारी २०२५ मधील अद्ययावत ७/१२ उताऱ्यावर बंदीचा शेरा स्पष्ट असतानाही दुय्यम निबंधकांनी तांत्रिक अडचणीमुळे म्युटेशन होत नव्हते म्हणून 'स्किप ऑप्शन' वापरला आणि वरिष्ठांची परवानगी न घेता हा दस्त नोंदवला, अशी माहिती चौकशीत निष्पन्न झाली आहे. पुण्यातील मुंढवा (४० एकर) आणि बोपोडी (१३ एकर) येथील गैरव्यवहारानंतर हा ताथवडेतील तिसरा मोठा घोटाळा उघडकीस आल्याने महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या गंभीर अनियमिततेबद्दल राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तात्काळ कारवाई करत हवेलीच्या सहाय्यक दुय्यम निबंधक विद्या शंकर बडे (सांगळे) यांना निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. शासकीय ताब्यातील जमीन विक्रीस नोंदवण्याच्या प्रक्रियेतील गैरव्यवहारात सहभागी झाल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत १२ नोव्हेंबर २०२५ पासून पुढील आदेश येईपर्यंत निलंबित करण्यात आले आहे. निलंबन काळात त्यांचे मुख्यालय प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे राहील आणि त्यांनी वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असेही सरकारच्या आदेशात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.